कृषीवल
रायगड, सोमवार, दि. २५ ऑगस्ट २०२५
किंमत ४ ₹

## नेव्हीच्या बोटीची प्रवासी बोटीला धडक

**उरण :** उरण जवळच्या समुद्रात प्रवासी बोटीला पुन्हा एकदा नेव्हीच्या स्पीड बोटीने धडक दिल्याची घटना शुक्रवारी (दि.२२) रात्री घडली. या अपघातात कोणतीही मोठी दुर्घटना किंवा जीवितहानी झाली नाही. मात्र १७ डिसेंबर २०२४ रोजी निलकमल या प्रवासी बोटीला नेव्हीच्या स्पीडबोटीने धडक दिल्याने १४ प्रवाशांना आपले प्राण गमवावे लागल्याच्या आठवणी जाग्या झाल्या असून नेव्हीच्या बोटींमुळे पुन्हा एकदा सागरी प्रवासाची सुरक्षा ऐरणीवर आल्याचे चित्र समोर येत आहे. मोरा ते भाऊचा धक्का या सागरी मार्गावर अनेक वर्षांपासून प्रवासी लाँच सेवा सुरू आहे. मोरा येथून शुक्रवारी रात्री आठ वाजता संत ज्ञानेश्वर ही प्रवासी बोट प्रवाशांना घेऊन मुंबईच्या भाऊच्या धक्क्याला चालली होती. पान २ वर

## ‘२९ तारखेला आरक्षणाचा तुकडाच पाडणार’

**जालना :** मराठा आरक्षणासाठी लढा देणारे मनोज जरांगे पाटील आपल्या मागण्यांसाठी मुंबईत धडकणार आहेत. येत्या २९ ऑगस्ट रोजी जरांगे पाटील आपल्या लाखो मराठा बांधवांसह मुंबईच्या आझाद मैदानात येणार आहेत. दरम्यान, जरांगे यांच्या या आंदोलनाची पुन्हा एकदा महाराष्ट्रभर चर्चा चालू झाली आहे. एकीकडे गणेशोत्सवाची धूम असताना दुसरीकडे जरांगे पाटील आंदोलनासाठी मुंबईत येणार असल्याने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, जरांगे हे मुंबईत येण्यावर ठाम असून त्यांनी येत्या २९ ऑगस्ट रोजी आरक्षणाचा तुकडा पाडणार असल्याचे त्यांनी बोलून दाखवले आहे. मनोज जरांगे हे जालन्यात बोलत होते. यावेळी त्यांनी २९ ऑगस्टच्या पान २ वर

### अलिबागमधील दीड एकर जमीन प्रकरणात

# सुहाना शाहरुख खान अडचणीत

## शर्तभंग करून परवानगीशिवाय केवळ साठेकराराद्वारे खरेदी केली सीआरझेडमधील जमीन


| अलिबाग | प्रतिनिधी |

**बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खानची लाडकी लेक सुहाना खान सध्या चर्चेत आहे. तिने अलिबागमध्ये शेती करण्यासाठी १ जून २०२३ रोजी दीड एकर जमीन विकत घेतली आहे. जमिनीचा व्यवहार आणि नोंदणीदेखील १ जून रोजीच झाली होती. या जागेची एकूण किंमत १२.९१ कोटी रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. या दीड एकर जागेत २२१८ चौरस फूट बांधकामही करण्यात आले आहे. मात्र ही जागा सरकारी असल्यामुळे तसेच जिल्हाधिकाऱ्यांची कोणतीही परवानगी न घेता हा व्यवहास झाल्याचे सुहाना खान अडचणीत सापडली आहे.**

अलिबाग तालुक्यातील थळ येथील सरकारी मालकीच्या जमिनीची विक्री बॉलिवूड आयकॉन शाहरुख खानची मुलगी सुहाना खानला हिला शर्थभंग करून कथित बेकायदेशीरपणे विक्री केल्याने प्रचंड खळबळ उडाली आहे. याबाबत सामाजिक कार्यकर्ते व वकील ॲड. विवेक ठाकूर यांनी दोन वर्षे पाठपुरावा करून पुराव्यांसह शासनाकडे या घोटाळ्याबाबत तक्रार दाखल केली आहे.



**ॲड. विवेक ठाकूर यांनी शासनाकडे दाखल केली तक्रार**


RECEIPT
(1) Mrs. Anjali Khote (2) Mrs. Rekha Khote (3) Mrs. Priya Khote (VENDORS)
We say received.

**काय आहे प्रकरण?**

थळ येथे समुद्रकिनारी असलेली सर्व्हे क्र. ३४५/२, क्षेत्रफळ ०.६०.७० हे.आर जमीन सन १९६८ मध्ये कडक ना विक्री कलमाअंतर्गत लागवडीसाठी मंजूर केलेली सीआरझेडमधील जमीन खोटे कुटूंबाने जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय केवळ साठेकराराद्वारे १२.९१ कोटी रुपयांना विकली असल्याची तक्रार ॲड. विवेक ठाकूर यांनी शासनाकडे दाखल केली आहे. या तक्रारीत महसूल अधिकारी, उपनिबंधक आणि साक्षीदारांवर संगनमत, सीआरझेडचे उल्लंघन, खोटे तपासणी अहवाल सादर करणे आणि कोट्यवधी रुपयांचा राज्य महसूल लपवल्याचा आरोप आहे. तक्रारदाराने सर्व विक्री कागदपत्रे रद्द करण्याची, भरपाईशिवाय जमीन सरकारजमा करण्याची आणि अनेक उच्चस्तरीय आदेशांना न जुमानता कारवाई करण्यास उशीर करणाऱ्या सरकारी अधिकाऱ्यांसह सर्व संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### कायदेशीर विश्लेषण

**1 जमिनीचा दर्जा आणि अटी**
ही जमीन भोगवटादार वर्ग २ मध्ये असून १९६८ च्या जिल्हाधिकारी आदेशान्वये नारायण विश्वनाथ खोटे यांना लागवडीसाठी देण्यात आली होती. त्या आदेशात जिल्हाधिकाऱ्याची पूर्वपरवानगी शिवाय विक्री, गहाण किंवा हस्तांतरण करता येणार नाही. परवानगीशिवाय हस्तांतरण झाल्यास जमीन परत सरकारकडे जमा करण्याचा स्पष्ट अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना असल्याचे नमूद आहे.

**2 साठेकराराचे स्वरूप**
३१ मे/१ जून २०२३ रोजी अंजली, रेखा व प्रिया खोटे यांनी सुहाना शाहरूख खान हिच्यासोबत नोंदणीकृत साठेकरार केला.कायद्यानुसार साठेकराराने मालकी हस्तांतर होत नाही. अंतिम मालकीसाठी नोंदणीकृत खरेदीखत आवश्यक असते. या व्यवहारात खरेदी खत झालेले नाही. परंतु नोंदणीकृत साठेकरार करून सरकारचा हक्क असलेल्या जमिनीसाठी १२ कोटी ९१ लाख रुपये देणे व स्वीकारणे हे बेकायदेशीर आहे. या जमिनीच्या अटींनुसार हा साठेकरारही हस्तांतरणाचा प्रयत्न मानला जाऊ शकतो.

**3 कायद्याचे संभाव्य उल्लंघन**
परवानगी न घेता व्यवहारजिल्हाधिकारी रायगड यांची मंजुरी नसताना सरकारी अटींच्या अधीन जमीन विक्रीसाठी करार करण्यात आला. सीआरझेड नियमांचे उल्लंघन करुन जमीन -१ क्षेत्रात असून त्यावर बांधकामे असल्याचा उल्लेख नाकारला गेला. मंडळ अधिकाऱ्याने बांधकाम नाही असा अहवाल दिला. जो तक्रारदारांच्या मते खोटा आहे.या व्यवहारातून १२.९१ कोटी रुपयांचा मोबदला झाला पण शासनाला ठराविक महसूल/अधिमूल्य मिळाले नाही.

**सुहाना शाहरूख खान वादातील जमीन कोणती?**
थळ सर्व्हे क्र. ३४५/२, क्षेत्रफळ ०.६०.७० हे.आर. ही जमीन १९६८ मध्ये लागवडीसाठी पान २ वर

## वेधक

### चोरी पकडताना अध्यक्षाच्या अंगावर घातली गाडी

**म्हसळा :** म्हसळा तालुक्यात खैरचोरी करताना रात्रीचा थरारक प्रकार घडला असून वन विभागाने जप्त केलेल्या गाड्या पुन्हा चोरून नेताना चक्क वन समिती अध्यक्ष तथा शिवसेना जिल्हा प्रमुख नंदू शिर्के यांच्या अंगावर चार ते पाच चोरांनी मिळून गाडी घातल्याचा प्रकार घडला. गुरुवारी सायंकाळी ६ वाजल्याच्या सुमारास काही अज्ञात लोक म्हसळा तालुक्यातील ताम्हाणे शिर्के येथील जंगलात खैर जातीचा झाड तोडत असल्याची खबर शिर्के यांनी वन खात्याला दिली. यावेळी सहाय्यक वन संरक्षक चौबे व त्यांच्या टीमने धाड टाकली असता आरोपी घटनास्थळावरून आपल्यासोबत आणलेल्या ४ गाड्या व छाटलेलं खैर ठेऊन पसार झाले. मात्र वन विभागातील पान २ वर

### कशेणे, इंदापूरमध्ये बिबट्याचा मुक्तसंचार

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील कशेणे व इंदापूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा मुक्तसंचार होत असल्याने नागरिक व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. परिणामी, शेतकरी शेतीकाम ला जाण्यास घाबरत असून, लहान मुले व महिला घराबाहेर जाण्यास टाळाटाळ करीत आहेत. या पार्श्वभूमीवर वनविभागाने तातडीने उपाययोजना करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. या बिबट्याच्या धुमश्चक्रीला आळा घालण्यासाठी तात्काळ पिंजरा लावून त्याला पकडण्यात यावे व त्याला दूर जंगलात सोडण्यात यावे, अशी लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे. पान २ वर

### जखमी गोविंदाचा उपचारादरम्यान मृत्यू

**मुंबई :** चौथ्या थरावरून खाली पडल्याने गंभीर जखमी झालेल्या पवई येथील गोखले नगर गोविंदा पथकातील एक गोविंदाचा मृत्यू झाला आहे. त्याच्यावर एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. या गोविंदाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. आनंद दांडगे असे या गोविंदाचे नाव आहे. त्याच परिसरातील गोखले नगर गोविंदा पथकात अनेक वर्षांपासून तो कार्यरत होता. तो १६ ऑगस्ट रोजी, दहीहंडीच्या दिवशी विक्रोळीच्या कन्नमवार नगर परिसरात पथकाकडून सात थर लावण्यात आले होते. त्यात चौथ्या थरावरून खाली पडून तो गंभीर जखमी झाला होता. आनंदच्या मानेला पान २ वर

### महावितरणच्या गलथान कारभारामुळे

## आठ वर्षाच्या चिमुकल्याचा बळी

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील सालवड येथील वाडीमध्ये खेळत असलेल्या चिमुरड्याला विजेच्या तारेचा स्पर्श झाला आणि त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना घडल्यानंतर महावितरण विरुद्ध प्रचंड जनक्षोभ पसरला असून ग्रामस्थ आणि परिसरातील लोकांनी महावितरण विरुद्ध आक्रमक भूमिका घेतली. ग्रामस्थांच्या आक्रमक भूमिकेनंतर कर्जत तालुक्याचा वीजपुरवठा खंडित करण्याची वेळ महावितरणवर आली.



**ग्रामस्थांच्या आक्रमक भूमिकेमुळे तालुक्याचा वीजपुरवठा खंडित**

शनिवारी (दि.२३) दुपारी कर्जत तालुक्यामध्ये मनाला चटका लावून जाणारी घटना घडली. नसरापूर ग्रामपंचायत हद्दीतील सालवड गावामध्ये महावितरणची मुख्य वीज वाहिनी पान २ वर

**कर्जत वीज संघर्ष समिती आक्रमक**

शिव भोसले या मुलाला शॉक लागुन दुर्देवी घटना घडली. या घटनेस असिस्टंट इंजिनिअर सिंग हे सर्वस्वी जबाबदार आहेत. ही मेन लाईन दोन दिवसांपूर्वी दुरुस्त केली होती. हे काम व्यवस्थित करून घेणे हि सर्वस्वी जबाबदारी सिंग यांची होती. सिंग यांच्यावर गुन्हा दाखल करुन त्यांना निलंबित करावे. याशिवाय सोमवारी याबाबत मोर्चा काढून जाब विचारणार असल्याचेही समितीच्यावतीने सांगण्यात आले.

## कशेडी घाटात बसने घेतला पेट

### प्रवाशांचे सामान जळून खाक; जीवितहानी नाही

| पोलादपूर | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडी घाटातील भुयारी मार्गापर्यंतच्या नवीन रस्त्यावर बोरिवलीहून मालवणपर्यंत जाणाऱ्या खासगी बसचा टायर गरम होऊन फुटला. यामध्ये बसने पेट घेतल्याने लागलेल्या आगीत बस पूर्णपणे जळून खाक झाली. रविवारी पहाटे २ वाजताच्या सुमारास पोलादपूर तालुक्यातील भोगाव गावाच्या हद्दीत ही बस प्रवाशांच्या सामानासह जळल्याची घटना घडली.



पोलादपूर पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चालक सचिन रघुनाथ लोके (वय ३०, रा. खार मुंबई) हा मनाली टूर्स अँड ट्रॅव्हल्सची खासगी बस (एमएच ०२ एफजी २१२१) घेऊन बोरिवली ते मालवण असा जात असता कशेडी घाटातील भोगाव गावाच्या हद्दीत भुयारी मार्गातील रस्त्याजवळ १०० मीटर अंतरावर बस चालवित घेऊन आला असताना बसच्या टायरला अचानक आग लागली. यावेळी प्रसंगावधान दाखवून चालकाने बस थांबविल्याने प्रवाशांना बसमधून बाहेर पडता आले. याचदरम्यान बसला आगीच्या ज्वाळांनी वेढले आणि संपूर्ण बस प्रवाशांच्या सामानासह भस्मसात झाली. मात्र, या खासगी बसमधील एकूण ४४ प्रवासी २ वाहक व १ क्लीनर असे ४७ जण बचावले. पान २ वर

### मालाडमध्ये इमारतीला आग

**मुंबई :** मुंबई शहरातील मालाड पूर्व इथं आज एका रहिवासी इमारतीला आग लागल्याची घटना घडली आहे. मालाड पूर्वेतील राणी सती मार्गावर असलेल्या वैष्णवी हाइट्स या इमारतीला दुपारच्या सुमारास भीषण आग लागली. या इमारतीत काही रहिवासी अडकल्याची भीती असून पान २ वर




**देशातील पहिली रो-रो कार सेवा धावली** | **कोलाड ते वेर्णा दरम्यान सेवा सुरू**

## कोकण रेल्वेचे नाव सुवर्ण अक्षरात कोरले

| रायगड | प्रतिनिधी |

देशातील पहिली रो-रो कार सेवा कोकण रेल्वेवरून चालवण्यात आली. त्यामुळे भारतीय रेल्वेच्या इतिहासात कोकण रेल्वेचे नाव सुवर्ण अक्षरात कोरले गेले आहे. पहिल्या रो-रो कार सेवेत एकूण पाच चारचाकी वाहने आणि १९ प्रवाशांचा प्रवास सुरू झाला.

रायगडमधील कोलाड ते गोव्यातील वेर्णा दरम्यान रो-रो कार सेवा सुरू करण्यात आली. शनिवारी दुपारी ३ च्या सुमारास कोलाड येथून रो-रो कार सेवेला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. पहिल्या सेवेसाठी कोलाड



नांदगाव दरम्यानच्या प्रवासासाठी चार वाहनांचे आरक्षण झाले. तर, वेर्णा येथे जाण्यासाठी एक वाहन आरक्षित झाले आहे. १० बीआरएन वॅगन, द्वितीय श्रेणीचा एक डबा, एसआरएलचा एक डबा अशी रो-रो कारची संरचना आहे.

कोकणातील रस्ते पूर्णपणे खड्डेमय झाले आहेत. तसेच पावसाळ्यात खड्ड्यात पाणी साचल्याने, खड्ड्यांचा अंदाज वाहन चालकाला येत नाही. खड्ड्यांमुळे वाहनांचे प्रचंड नुकसान होते. पान २ वर

**अट शिथिल**

कोकण रेल्वे प्रशासनाने रो-रो कार सेवेसाठी कमीत कमी १६ वाहनांची अट घातली होती. परंतु, प्रवाशांकडून फारसा प्रतिसाद न मिळाल्याने पहिल्या रो-रो कार सेवेसाठी १६ वाहनांची अट शिथिल करण्यात आली. परंतु, त्यापुढील रो-रो कार फेरीसाठी कार आरक्षणाची संख्या अपुरी असल्यास फेरी रद्द केली जाईल. २४ ऑगस्ट ते ११ सप्टेंबरदरम्यानच्या रो-रो कार सेवेच्या प्रवासासाठी तीन दिवस आधी आरक्षण केले जाईल.



कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# शहापूर-धेरंड मधील शेतकऱ्यांना प्रशासनाचा अल्टीमेटम

। रायगड । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील शहापूर धेरंड मधील शेतकऱ्यांनी प्रशासनाने शेवटचा अल्टीमेटम दिला आहे. प्रस्तावित औद्योगिक क्षेत्राच्या पोहोच रस्त्यासाठी समंतीने जागा देण्याची २९ ऑगस्ट ही शेवटची मुदत असणार आहे. त्यानंतर सक्तीने भूसंपादनाची प्रक्रिया सुरु होणार आहे.

अलिबाग तालुक्यातील शहापूर धेरंड औद्योगिक वसाहतीमध्ये सिनारमन्स कंपनीचा आशिया खंडातील सर्वात मोठा पेपर उद्योग प्रकल्प येऊ घातला आहे. या प्रकल्पासाठी यापूर्वी टाटा कंपनीच्या औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पासाठी संपादीत केली जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यासाठी सिनारमन्स कंपनी आणि राज्यसरकारमध्ये सामजस्य करारही झाला आहे. मात्र या औद्योगिक क्षेत्रासाठी शहाबाज येथील पोहोच रस्ता एकूण ८.५५ हेक्टर क्षेत्र संपादीत केले जाणार आहे.



उच्चाधिकार समितीने या भूसंपादनासाठी प्रतिएकरी ९६ लाख ६९ हजार ५५४ रुपये म्हणजेच एका हेक्टरसाठी २ कोटी ४१ लाख ७३ हजार रुपये येवढा दर निश्चित केला आहे. संमती करारावद्वारे भूसंपादन करून, ही शेतकऱ्यांना दिली जाणार आहे. यासाठी शेतकऱ्यांना महाराष्ट्र औद्योगिकविकासअधिनियम१९६१ च्या कलम ३३(३) च्या नोटीसा बजावण्यात आल्या होत्या, ३१ जुलै पर्यंत उपविभागीय कार्यालयाकडे करारपत्र सादर करण्याचे निर्देश शेतकऱ्यांना देण्यात आले होते. त्यानुसार काही शेतकऱ्यांनी करार पत्र प्रांताधिकारी कार्यालायात दाखल केली होती. संपतीपत्र दाखल केलेल्या शेतकऱ्यांना आरटीजीएस प्रणालीव्दारे मोबदला वितरण सुरू करण्यात आले होते. मात्र वाढीव मोबदल्याची मागणी करत अनेक शेतकऱ्यांनी या भूसंपादनाला विरोध केला होता. मात्र आता शेतकऱ्यांना संमतीपत्र दाखल करण्याची शेवटची संधी प्रशासनाने दिली आहे.

ज्या शेतकऱ्यांनी करारपत्र सादर केलेले, नाही त्यांनी समक्ष उपस्थित राहून संमती करारपत्र दाखल करण्यास सागण्यात आले आहे. हे संमतीपत्र दाखल करण्यासाठी २९ ऑगस्ट ही अंतिम मुदत असणार असल्याची माहिती उपविभागीय अधिकारी अलिबाग मुकेश चव्हाण यांनी दिली आहे. यानंतर सक्तीने भूसंपादनाची प्रक्रिया पुढे नेली जाणार आहे.

करारपत्र सादर करण्याची मुदत संपुष्टात आली असली तरी ज्या खातेदारांना उच्चाधिकार समितीने मंजुरी दिलेला दर मान्य असेल त्यांनी आपले संमती करारपत्र उपविभागीय अधिकारी अलिबाग यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्टया वगळून ) समक्ष उपस्थित राहून दिनांक २९ ऑगस्ट पर्यंत सादर करावे असे आवाहन चव्हाण यांनी केले आहे.

## सोनसाखळी चोर पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल :** रबाळे पोलिसांनी सोनसाखळी खेचणाऱ्या एका सराईत चोरट्याला कोपरखैरणे परिसरातून अटक केली आहे. रोहित गायकवाड असे त्याचे नाव असून, त्याने केलेल्या सोनसाखळी चोरीच्या दोन गुन्ह्यांना उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. तसेच पोलिसांनी या दोन्ही गुन्ह्यांतील २ लाख ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत केल्याचे सांगितले आहे. श्यामलता सिंग खाडी ब्रिजवरून जात असताना रोहितने तिच्या छातीत जोरात बुक्का मारून गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून पोबारा केला होता. गुप्त माहितीदारांच्या मदतीने आरोपीचा शोध घेतला. पोलिसांनी रोहित याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने घणसोलीत दोन गुन्हे केल्याची कबुली दिली. त्यावर पोलिसांनी त्याच्याकडून श्यामलता सिंघ यांची ७० हजारांची सोन्याची चेन व १ लाख ७० हजार रुपयांचे मिनी मंगळसूत्र असे एकूण २.४० लाख रुपये किमतीचे दागिने हस्तगत केले.

# विमानतळ परिसरातील भरावामुळे अतिवृष्टीत पुराचा धोका कायम

। पनवेल । वार्ताहर ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भरावामुळे पनवेल शहरासह अनेक गावांना आणि सिडकोच्या वसाहतींना पुराचा धोका निर्माण झाला आहे. अतिवृष्टीमध्ये गव्हाण फाटा येथे पळ-स्पे ते जेएनपीटी या राष्ट्रीय महामार्गावर साचलेल्या दीड फुट पाण्यामुळे वाहतूक ठप्प झाली. मात्र गेल्या तीन दिवसांपासून सुरू असणाऱ्या पावसामुळे विमानतळाजवळील गावांमध्ये राहणाऱ्या ग्रामस्थांची चिंता वाढली आहे.

डुंगी गावात उंबऱ्यापर्यंत पाणी होते. १० गावांतील ग्रामस्थांप्रमाणे विमानतळबाधित गावकऱ्यांना पुनर्वसनाचे पॅकेज मिळावे आणि गावकऱ्यांचे सुखरूप स्थलांतर सुरक्षित जागेवर करावे ही मुख्य मागणी या ग्रामस्थांकडून केली जात आहे सिडकोने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी पहिल्या टप्यात १० गावांचे पुनर्वसन केले. पनवेल तालुक्यातील चिंचपाडा, कोळी/कोल्ही, कोपर, उलवे, वरचे ओवळे, ओवळे - कोंबडभुजे, वाघिवली/वाघिवलीवाडा,गणेशपुरी, तरघर या गावानंतर पारगाव-डुंगी या गावांचे सुद्धा भागाक्षेत्रालगत असल्याने पुनर्वसन करण्याचा निर्णय सिडकोने घेतला. आजही पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण न झाल्याने डुंगी गावात ७० कुटुंब आणि पारगाव येथे पाचशे कुटूंब येथे वास्तव्य करतात. खाडी किनारपट्टी पारगाव पासून एक किलोमीटर अंतरावर असली तरी डुंगी गावकऱ्यांचे डोळे प्रत्येक पावसात ढगाकडे लागतात.

सिडकोच्या अभियांत्रिकी विभागाने डुंगी गावालगत पावसाळी पाणी गावात थेट शिरू नये म्हणून धरण तलावाची निर्मिती गावालगत केली. हा धरणतलाव तुडूंब भरल्याने तलावाबाहेर पाणी जाण्यास सुरुवात झाल्याचे या गावचे माजी सरपंच विकास नाईक यांनी सांगितले. ग्रामस्थांनी पूरसदृश्य स्थिती पासून वाचण्यासाठी त्यांच्या घरातील सामान वरच्या बाजूला ठेवण्याची सुरुवात केली होती.मागील दोन वर्षांपूर्वी डुंगी गावात अतिवृष्टीत कंबरेभर पाणी साचत होते. मात्र सिडकोने येथे मोटारपंपाच्या सहाय्याने पाणी उपसा करण्याची सोय ठेवल्याने गेल्या तीन दिवसाच्या सततच्या पावसात घरात पाणी शिरले नाही.

मोटारपंपांची क्षमता वाढविण्याची मागणी माजी उपसरपंच नाईक यांनी केली आहे. विमानतळाचा भराव गावालगत झाल्याने पाण्याचा निचरा ज्यापद्धतीने होणे गरजेचे आहे तसे होताना दिसत नसल्याने गावकऱ्यांची चिंता वाढली आहे. डुंगी गावच्या ग्रामस्थांनी मागील अनेक वर्षांपासून सिडकोकडे सुधारित पुनर्वसन पॅकेज देण्याची मागणी केली आहे.

# विघ्नहर्ता पुरस्कार वितरण समारंभ संपन्न

। पनवेल । वार्ताहर ।



नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या वतीने सार्वजनिक गणेशोत्सव सन २०२४ मधील उत्कृष्ट गणेश मंडळांना विघ्नहर्ता पुरस्कार प्रदान करण्यात आले. हा सोहळा पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३, पनवेल, प्रशांत मोहिते हे उपस्थित होते. तर प्रमुख अतिथींमध्ये सहा. पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, भाऊसाहेब ढोले, सहा पोलीस आयुक्त विक्रम कदम, वपोनि नितीन ठाकरे, वपोनि गजानन घाडगे, जयंत पगडे, अजय बहिरा यांच्यासह पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी आणि लोकप्रतिनिधी उपस्थित होते. या कार्यक्रमात उत्कृष्ट गणेशमूर्ती गटात प्रथम क्रमांक श्री गणेश उत्सव मंडळ, स्वामी विवेकानंद चौक,उरण तर द्वितीय क्रमांक श्री गणेश मित्र मंडळ, सेक्टर ३४, कामोठे यांनी पटकावला. उत्कृष्ट कार्यक्रम व सामाजिक उपक्रम गटात प्रथम क्रमांक शंभो मित्रमंडळ, सेक्टर ३५, कामोठे, व्दितीय क्रमांक गणेश मित्र मंडळ, सेक्टर १८, खारघर, शिस्तबद्ध गणेश विसर्जन मिरवणूक गटात प्रथम क्रमांक जय दुर्गा क्रीडा व ग्रामविकास तरुण मंडळ, रोहिंजण, तळोजा तर द्वितीय क्रमांक अभिनव युवक मित्र मंडळ, पायोनियर विभाग, पनवेल यांनी पटकावला, उत्कृष्ट देखावा या गटात प्रथम क्रमांक राजे शिवाजीनगर रहिवाशी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, कळंबोली. द्वितीय क्रमांक एकविरा मित्र मंडळ, तक्का, पनवेल, सर्वोत्कृष्ट गणेश मंडळ गटात प्रथम क्रमांक जय हनुमान सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, रिटघर, तर द्वितीय क्रमांक अनमोल जीवन वेलफेअर असोसिएशन, उलवे यांनी पटकावला त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच यावेळी पनवेल कोळीवाडा येथे विसर्जनासाठी मदत करणाऱ्या स्वयंसेवकांचा आणि परीक्षक मंडळाचा सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी ॲड. सुरेश बोंद्रे, दत्तात्रय सुळेभाविकर, शामल आंग्रे, कविता ठाकुर, ॲड. संतोषी चव्हाण, आणि ॲड. सतिश देशमुख या परीक्षक मंडळांचा देखील सत्कार करण्यात आला.

## घरकाम करणाऱ्या महिलेने केली दागिन्यांची चोरी

**पनवेल :** खारघर वसाहत सेक्टर १४ येथील रघुनाथ विहार या सोसायटीमधील एका सदनिकेत घरकाम करणाऱ्या महिलेने तब्बल पाच लाख रुपयांच्या दागिन्यांची चोरी केली आहे. या प्रकरणी खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सेक्टर १४ येथील रघुनाथ विहार या सोसायटीमध्ये राहणाऱ्या ६८ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीमध्ये त्यांच्या घरात काम करण्यासाठी नेमलेल्या महिलेने कपाटामध्ये ठेवलेल्या दागिन्यांवर डल्ला मारला आहे. खारघर पोलिसांनी या प्रकरणी घरकाम करणाऱ्या महिलेवर कारवाई केली. पोलिसांनी कामगारांचे चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र तपासण्याचे आवाहन केले आहे.

# गाळ काढूनही पुराची भीती कायम

## करोडो रुपये खर्च करून गाळ काढला तरी पूर आलाच - पंकज उमासरे

। महाड । वार्ताहर ।

महाडमध्येगेलेदोनदिवसांपासून पूरजन्य परिस्थिती उद्धवली आहे. यामुळे महाडकर नागरिक चांगले धास्तावलेले आहेत. करोडो रुपयांचा गाळ काढून देते महाड शहराला पुराचा धोका आणि नागरिकांना पुराच्या पाण्याची भीती कायम असल्याचे दिसून येत आहे. याबाबत महाडकरांमध्ये संताप व्यक्त होत असून करोडो रुपये खर्च करून देखील पूर परिस्थिती उद्भवत असेल तर काढलेल्या गाण्याचा हिशोब द्या असे संतप्त मागणी महाड मनसेचे पंकज उमासरे यांनी केली आहे.

सन २०२१ मध्ये महाड शहरात महापुराने हाहाकार माजवला. यामुळे मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली होती. महाडमध्ये पुराची समस्या कायम भेडसावत असते. सन २००५ रोजी पूरपरिस्थिती उद्भवून आर्थिक नुकसान झाले होते त्याचप्रमाणे जवळपास तीन गावांमध्ये दरड कोसळून देखील झाले होते. त्यानंतर सातत्याने महाडमध्ये पूर येण्याची समस्या कायम राहिली. २०२१ मधील महापुरानंतर महाड मधील पूरनियंत्रणाबाबत सातत्याने आवाज उठवण्यात आला.

पूर समिती स्थापन झाल्यानंतर विविध पर्याय येथील सुचवण्यात आले. या पर्यायामध्ये गाळ काढण्याच्या कामाला प्राधान्य देण्यात आले. मात्र महाराष्ट्रातील अनेक पर्यावरणवाद्यांनी महाड मधील पूर समस्येवर महाड परिसरात वाहणाऱ्या नद्यांवर छोट्या बंधाऱ्यांचा पर्याय सुचित केला होता मात्र काळ काढून स्वतःचा फायदा करून घेणाऱ्यांना गाळ काढण्याच्या कामावरच भर दिला. महाडच्या पुराचा भावनिक मुद्दा तयार झाल्याने महाड सह चिपळून खेड या ठिकाणी देखील नद्यांमधील गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात झाली.

या कामांसाठी करोड रुपये शासनाने खर्च केले. जलसंपदा आणि महसूल विभागाने स्वतःच्याच विभागांची नियमावली पायदळी तोडून वारे माप गाळ उपसा केला. या गाळ काढण्यातून महाडच्या जनतेचा मात्र काडीचा फायदा झाला नाही उलट बाळ काढणाऱ्यांचा आणि राजकीय नेत्यांचा चांगलाच फायदा झाल्याचे दिसून येत आहे.

२०२१ मध्ये सुमारे ८०० मिली मीटर पाऊस आता फक्त २०० मिली मीटर पाऊस तरीही पूर आला. सन २०२१ मध्ये महाड सह संपूर्ण परिसरात जोरदार पर्जन्यवृष्टी झाली होती. दोन दिवसात सुमारे ८०० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आणि महाड मध्ये हाहाकार माजला होता. मात्र गेली दोन दिवसात केवळ २०० मिली मीटर पाऊस पडला आणि महाड शहरात पुराचे पाणी दाखल झाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. जर दोनशे हून अधिक मिलिमीटर पाऊस पडला असता तर पुराचे पाणी काही फुटाने महाड मध्ये आले असते असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

लाखोटनाचागाळकाढल्यानंतर देखील यावर्षी ऐन ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टी मध्ये महाड शहरांमध्ये विशेषतः मुख्य बाजारपेठेत पुराचे पाणी दाखल झालेच. याबाबत महाड मनसे शहर प्रमुख पंकज उमासरे यांनी संतप्त प्रतिक्रिया दिली असून करोडो रुपयांचा गाळा काढून देखील पुराचे पाणी आले मग गाळ काढून पूर येणार नाही अशी खात्री शासनाने का दिली नाही असा सवाल करून काढलेला गाळा नक्की गेला कुठे आणि खर्च झालेले करोडो रुपये याचा हिशोब देखील द्यावा लागेल असा इशारा दिला आहे.

पान १ वरुन

## सुहाना शाहरूख खान अडचणीत

अटींसह नारायण विश्वनाथ खोटे यांना देण्यात आली होती. त्या जमिनीला जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय इतर वापरास व विक्रीस बंदी होती. १९६८-६९ साली या जमिनीची लागवडीसाठी वापर व झाडे लावण्यासाठी नारायण विश्वनाथ खोटे यांना शासनाकडून परवानगी देण्यात आली होती. ही जमीन देताना जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या परवानगीशिवाय विक्री/तबादला/गहाण व्यवहार बंदी अशी प्रमुख अट नमूद केली होती. त्यानंतर नारायण विश्वनाथ खोटे यांचे वारस असलेल्या अंजली खोटे, रेखा खोटे व प्रिया खोटे यांनी ही जमीन वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रूपांतर करण्याचा अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केला होता. मात्र त्यावर अद्यापही परवानगी मिळालेली नाही.

**तक्रारदाराचे आरोप**

वारस अंजली, रेखा व प्रिया खोटे यांनी १ जून २०२३ रोजी १२.९१ कोटी रुपयांना सुहाना शाहरूख खान हिला नोंदणीकृत साठेकराराद्वारे वर्ग-२ ची जमीन बेकायदेशीररित्या विकली. यासाठी जिल्हाधिकारी रायगड यांची परवानगी घेतली नाही. जमीन हस्तांतरणासाठी अंजली, रेखा व प्रिया खोटे यांनी १४ फेब्रुवारी २०२२ मध्ये वर्ग २ ते वर्ग १ करण्यासाठी जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे अर्ज केला. परंतु या अर्जानुसार त्यांना परवानगी दिलेली नाही हे माहिती अधिकारामध्ये उघड झाले आहे. महसूल विभागाच्या कायदेशीर परवानगीशिवाय साठेकराराव्दारे १२.९१ कोटीला सुहाना शाहरूख खान यांना ती जमीन विक्री करण्यात आली.

**कोस्टल रेग्युलेशन झोनमध्ये जमिनीची नोंद**

या जागेत अनधिकृत बांधकामे (घर नं. १७७०, १७७१, ३६७) करण्यात आली. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांची कोणतीही परवानगी नाही. तरीही तत्कालीन मंडळ अधिकारी आर.एन. मांढरे यांनी जमिनीवर कोणतीही बांधकामे नाहीत, असा खोटा अहवाल तहसिलदार यांच्याकडे सादर केला. या अहवालातील पंचनाम्यावरील सह्या करणाऱ्या व्यक्ती सुहाना शाहरूख खान यांच्या वडिलांच्या कंपनीशी निगडीत असल्याचा ॲड.ठाकूर यांचा आरोप आहे. तसेच माजी मंडळ अधिकारी आर.एन. मांढरे यांच्यावर खोटी माहिती व तपासाचा गैरवापर केल्याचा तसेच सब-रजिस्ट्रार व महसूल कर्मचारी यांचे संगनमत असल्याचा आरोप तक्रारदार ॲड. ठाकूर यांनी केला आहे.

**तक्रारदारांची मागणी**

जमीन सरकार ताब्यात घेऊन जनकल्याणासाठी राखीव ठेवावी. साठेकरार व संबंधित सर्व कागदपत्रे रद्द करावीत. विक्रेते, खरेदीदार, अधिकाऱ्यांवर व पंचांवर कायदेशीर कारवाई करावी. चौकशी लवकर पूर्ण करून जबाबदारांवर गुन्हा दाखल करावा.

## २९ तारखेला आरक्षणाचा तुकडाच पाडणार

मोर्चाबाबत भाष्य केले. या मोर्चासाठी मराठा बांधवांनी मोठ्या ताकदीने आले पाहिजे. २९ ऑगस्टला सर्वांनी मुंबईला या असे आवाहन आहे. समाजाचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे, असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले. तसेच, राजकारण्यांच्या दबावात कोणीही राहू नये. मुंबईत कोणताही राजकारणी येणार नाही. सरकारमधून आम्हाला प्रतिसाद दिला जात नाही. मुख्यमंत्री फडणवीस यांचे मराठ्यांना बरबाद करण्याचे स्वप्न आहे. मराठ्यांची पोरं आत्महत्या करून मेली पाहिजेत, हे त्यांचं काम आहे, असा गंभीर आरोपही त्यांनी केला.

## आठ वर्षाच्या चिमुकल्याचा बळी

टाकण्याचे काम सुरू होते.त्यातील एक वीज वाहिनी शिव रूपेश भोसले या लहानग्याच्या अंगावर पडून त्या बालकाचा मृत्यू झाला. शिव रुपेश भोसले हा दुपारी रस्त्याने जात असताना मेन लाईन अंगावर पडल्यामुळे त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांनंतर तातडीने चिमुकल्या बाळाला उपचारासाठी कर्जत येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. परंतु रुग्णालयात नेण्याआधी त्या बालकाचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. या घटनेने संपूर्ण सालवड गावावरती शोककळा पसरली असून भोसले कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. बालकांचे आई-वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे. याप्रकरणी संतप्त ग्रामस्थांनी महावितरणचा तीव्र शब्दात निषेध केला आहे. महत्त्वाचे म्हणजे नवीन काम करण्यात आलेल्या मेन लाईनच्या तारा नवीन बसवण्यात आल्या होत्या. त्या तुटल्यास कशा असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे? या नवीन काम करण्यात आलेल्या महावितरणच्या कामाला जबाबदार कोण? असा प्रश्नदेखील उपस्थित केला जात आहे. याचाच निषेध करण्यासाठी मृताचे नातेवाईक आणि ग्रामस्थ उपकार्यकारी अभियंता यांचे कार्यालय कळंबोली येथे मृतदेह घेऊन पोहोचले. तसेच न्याय मिळत नाही, तोपर्यंत मृतदेह तेथून हलवला जाणार नाही. त्या ठेकेदारावर तात्काळ मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात यावी, अशी पोलीस प्रशासनाकडे मागणी करण्यात आली.

## कशेडी घाटात बसने घेतला पेट

या घटनेची माहिती पोलादपूर पोलीस ठाण्यात समजताच सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे, पीएसआय पवार, पोलीस हवालदार बामणे, ठाणे अंमलदार रंजेश पवार, जाधव, खराडे, कदम, मोरे, साळुंखे, शिंदे व होमगार्ड सुनील जगताप हे घटनास्थळी तातडीने रवाना झाले. याचवेळी कशेडी टॅप पोलीस मदत केंद्राचे पीएसआय संतोष डोलारे, पोलीस हवालदार चाटे व मोहिते यांनीही घटनास्थळी जाऊन वाहतुकीची कोंडी होऊ नये, म्हणून दक्षता घेतली.

## कोकण रेल्वेचे नाव सुवर्ण अक्षरात कोरले

त्याचबरोबर इंधन खर्च, प्रवास कालावधी जास्त होतो. तसेच सलग वाहन चालविल्याने चालकांची खूप मोठी गैरसोय होते. रो-रो कार सेवेद्वारे सर्व कटकटीपासून प्रवाशांना मुक्तता मिळणार आहे. रस्त्याने कोलाड ते वेर्णा प्रवासासाठी सध्या १० ते १२ तास लागतात. तर, रो-रो सेवेमुळे रेल्वेने १२ तासांचा प्रवास आहे. मात्र, ३ तासांपूर्वी पोहोचणे आणि गाडी लोडिंगची आवश्यकता असल्याने, एकूण वेळ वाचत नाही. त्यासोबतच ७,८७५ रुपये प्रति वाहन आणि प्रवाशांचे स्वतंत्र भाडे हा खर्चही सर्वसामान्यांना परवडणारा नाही. गणेशोत्सव काळात कोकण रेल्वे मार्ग अत्यंत व्यस्त असतो. अशावेळी मालवाहतुकीसाठी वेगळी गाडी चालवणे प्रवासी रेल्वेगाड्यांच्या वेळापत्रकावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे मत रेल्वे प्रवाशांनी व्यक्त केले.

## कशेणे, इंदापूरमध्ये बिबट्याचा मुक्तसंचार

माणगाव वन विभागाचे वनपरिक्षेत्रपाल प्रशांत शिंदे हे बाहेरगावी गेल्यामुळे कार्यालयीन अधीक्षक यांच्याकडे हे निवेदन देऊन सविस्तर चर्चा करण्यात आली. जर वनविभागाने या बिबट्यासाठी वेळीच खबरदारी घेतली नाही तर भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना होऊ शकते. अशा दुर्घटनेची संपूर्ण जबाबदारी वनविभागावर राहील. वनविभागाने या विषयाकडे दुर्लक्ष केले तर नजीकच्या काळात माणगाव तालुक्यात उग्र आंदोलन छेडेल जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे. वनविभागाच्या वतीने ग्रामस्थांचे बैठक घेऊन या बैठकीत काळजी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. रात्रीच्या वेळी बाहेर पडताना काठी, बॅटरी सोबत ठेवावी. परिसरात अनोळखी हालचाली दिसल्यास तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा. वनविभागाने दक्षतेचा इशारा देतानाच आपले वनपाल व वनरक्षक सतत गस्त घालत असल्याची माहिती दिली.

## नेव्हीच्या बोटीची प्रवासी बोटीला धडक

मात्र ही प्रवासी बोट मोरा बिकन आणि नेव्ही जेट्टीच्या दरम्यान आली असताना साडेआठ वाजण्याच्या सुमारास नेव्हीच्या स्पीड बोटीने या प्रवासी बोटीला धडक दिली. मात्र सुदैवाने ही स्पीड बोट प्रवासी बोटीच्या कडेला घासली. जर ही धडक थेट बोटीच्या मध्य भागाला झाली असती तर मोठी दुर्घटना झाली असती. यावेळी प्रवासी बोटीतून १० प्रवासी प्रवास करत होते. या अपघातानंतर प्रवाशांमध्ये घबराट आणि गोंधळ उडाला होता. नेव्हीच्या बोटी बेदरकारपणे समुद्रात फिरत असतात. त्यांना या बाबत कोणी जाब विचारला तर ते दादागिरी करतात आणि कुणालाही जुमानत नाहीत. डिसेंबर २०२४ ला अशाच प्रकार निलकमल बोटीला नेव्हीच्या स्पीडबोटीने धडक दिली होती. या घटनेत १४ जणांचा मृत्यू झाला होता. कालच्या घटनेने पुन्हा एकदा या अपघाताच्या आठवणी ताज्या झाल्या होत्या. याबाबत मुंबईच्या यलोगेट पोलीस ठाण्यात प्रवासी बोट मालकाने तक्रार केली आहे. शुक्रवारी रात्री मोरा येथून सुटणाऱ्या शेवटच्या लाँचला नेव्हीच्या जेट्टीजवळ नेव्हीच्या स्पीड बोटीने धडक दिली. या प्रवासी बोटीत १० प्रवासी होती. सुदैवाने यामध्ये कुणालाही इजा झाली नाही. मात्र प्रवासी बोटीचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे. अपघातानंतर प्रवाशांना घेऊन ही बोट भाऊच्या धक्क्यापर्यंत सुरक्षितपणे आणण्यात आली, असे बंदर अधिकारी सुशिल सातेलकर यांनी सांगितले.

## खैरचोरी पकडताना अध्यक्षाच्या अंगावर घातली गाडी

कर्मचाऱ्यांनी नामी शक्कल लढवत गाड्यांच्या टायरची हवा सोडून जप्त केलेल्या गाड्या घटनास्थळी ठेऊन निघून गेले. वन विभागाच्या चुकीमुळे रात्रीच्या वेळेस चोरांना पुन्हा संधी मिळाली असून जप्त केलेल्या आपल्या गाड्या पुन्हा चोरून घेऊन जाताना त्यांना शिर्के यांनी पकडले. मात्र चारपैकी दोन गाड्या घेऊन पसार होण्यास आरोपींना यश आले. तालुक्यातील खैरचोरी करणाऱ्यांना मदत करण्यात खामगाव वनविभागाचा मोलाचा वाटा असल्याचा आरोप शिवसेना जिल्हा प्रमुख तथा वन समिती अध्यक्ष नंदू शिर्के यांनी केला.

## मालाडमध्ये इमारतीला आग

दुर्घटनेबाबतची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या १० ते १२ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या आहेत. जवानांकडून आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले जात असून सुदैवाने या आगीत जीवितहानी झाली नसल्याचे समजते. मालाडमधील वैष्णवी हाइट्स या इमारतीच्या ११ व्या मजल्यावर आज दुपारी साडेतीन ते चार वाजताच्या दरम्यान अचानक आग लागली. त्यानंतर इमारत परिसरात मोठा गोंधळ उडाला. स्थानिकांनी या दुर्घटनेची माहिती अग्निशमन दलाला दिल्यानंतर काही वेळातच १० ते १२ गाड्यांसह अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले. तसंच दिंडोशी पोलीस ठाण्याचे कर्मचारीही काही वेळातच वैष्णवी हाइट्स इथं पोहोचले. अग्निशमन दलाच्या जवानांकडून आग विझवण्यासाठी प्रयत्न केले जात आहे.

## जखमी गोविंदाचा उपचारादरम्यान मृत्यू

आणि डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने गेल्या आठ दिवसांपासून त्याच्यावर कन्नमवार नगर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र उपचार सुरू असताना शनिवारी दुपारी दोनच्या सूनरास त्याचा मृत्यू झाला आहे. त्याच्या मृत्यूनंतर पवईत शोककळा पसरली असून विक्रोळी पोलिसांनी याबाबत अपमृत्यूची नोंद करत मृतदेह शवविच्छेदनासाठी राजावाडी रुग्णालयात पाठवला आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की मौजे नडोदे ता. खालापुर जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे आशिलांनी कब्जेदारांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**मौजे.नडोदे ता. खालापुर जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | गट नं | क्षेत्र (हे. आर. पॉ) | आकार(रू.पै.) |
|---|---|---|---|
| देहुबाई अनंता बेलोशे | ४८/२ अ | एकुण क्षेत्र १-७४-७० हे. आर. पॉ यापैकी देहुबाई अनंता बेलोशे यांचे सदर जमिन मिळकतीमध्ये असलेले अविभक्त हिश्याचे खरेदी घेणार यांना विकत दिलेले क्षेत्र ०-३४-९४ हे. आर. पॉ | १३.३९ |

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, खरेदीखत, पोटगी, चार्ज बक्षिस वहीवाट इजमेंट बोजा तारण, वारसा ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत सकृतदर्शनी पुराव्यासह खाली नमुद ॲडव्होकेट यांचेकडे सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसाचे आत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही काहीही हरकत न आल्यास सदरची मिळकत ही निर्वेध बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ता. २५/०८/२०२५
मो.नं. ८००७५३७६५६

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट.
**ॲड. महेश क थोरवे**
रा : कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड. ४१०२०१

**जाहीर नोटीस**
**श्रीवर्धन येथील मा. कार्यकारी दंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात**

अर्ज क्र. ६८/२०२४

श्रीम. जुलेखा रिझवान जालगावकर ( लग्नानंतरचे नाव )
श्रीम. जुलेखा खैरूद्दीन बडे (लग्नापूर्वीचे नाव) ...अर्जदार
वय ४६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा. मु. पो. जसवली, ता. श्रीवर्धन जि. रायगड

विरुद्ध

मा. ग्रामीण विकास अधिकारी तथा जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
मौजे जसवली, ता. श्रीवर्धन जि. रायगड
मा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती ...सामने वाला
श्रीवर्धन ता. श्रीवर्धन जि. रायगड

तमाम लोकांस कळविण्यात येते की, यातील अर्जदार श्रीम. जुलेखा रिझवान जालगावकर (लग्नानंतरचे नाव), श्रीम. जुलेखा खैरूद्दीन बडे (लग्नापूर्वीचे नाव) रा. मु. पो. जसवली, ता. श्रीवर्धन जि. रायगड येथील कायमस्वरूपी रहिवासी आहेत. अर्जदार यांचा जन्म दि. ०८/१२/१९७९ (अक्षरी आठ डिसेंबर एकोणीशे एकोणऐंशी) रोजी मु. जसवली, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माच्या नोंदी बाबत मिळणे करिता वा तशा प्रकारचे निर्देश यातील सामनेवाले यांस मे. कोर्टामार्फत देणे करिता मे. कोर्टात जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये नोंद करून मिळणे करिता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. सदरचा जन्माचा दाखला हा अर्जदार यांस शासकीय कामासाठी व इतर खाजगी कामे करण्यात कामे हवा आहे. यापूर्वी मा. न्यायालयाने सदर जन्माचा दाखला देण्याबाबत आदेश पारित केले होते मात्र मा. तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी श्रीवर्धन यांनी दि. ०४/०८/२०२५ रोजी दिलेल्या पत्रानुसार पुनश्च जाहीर नोटीस देण्याबाबत अर्जदारास सांगितले आहे.

सबब या नोटीसीने कळविण्यात येते की, त्यासंबंधी कोणाचीही हरकत वा तक्रार असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या नंतर लेखी हरकत घेण्यात यावी. अर्जदार यांचा जन्म ०८/१२/१९७९ रोजी मु. जसवली ता. श्रीवर्धन जि रायगड येथे झाला आहे. याबाबत ही तारीख खरी आहे म्हणून मा. न्यायालय संबंधित सामन्यावाले यांस निर्देश देतील व इतर कोणाची तक्रार अगर हरकत घेतली जाणार नाही.

स्थळ: श्रीवर्धन
२३/०८/२०२५

सही/-
मा.कार्यकारी दंडाधिकारी
ता. श्रीवर्धन जि. रायगड

## निवडक



### जीवघेण्या खड्ड्याने जनता बेजार

**पाली:** पाली-खोपोली राज्यमहामार्ग मागील अनेक वर्षांपासून मृत्यूचा सापळा म्हणून ओळखला जात आहे. या महामार्गावर आजवर अनेक जीवघेणे अपघात होऊन हजारो निष्पाप जीवांचा बळी गेला आहे. रस्त्याच्या दुरावस्थेचा फटका प्रवासी व वाहनचालक यांना मोठ्या प्रमाणावर बसत आहे. महामार्गावर सध्या ठिकठिकाणी जीवघेणे खड्डे पडले आहेत. खडी, दगडगोटे व चिखलाने तर रस्त्याची भयावह अशी दुरवस्था झाली आहे. त्यामुळे रस्त्यावरील खड्ड्यांनी जनता अक्षरशः बेजार झाली आहे. या मार्गावरून प्रवास करताना पाली-खोपोली हा राज्यमहामार्ग आहे की डोंगर कड्या कपारीची वाट आहे, असा संताप प्रवासी वर्गासह स्थानिकांकडून व्यक्त केला जात आहे. हा रस्ता खस्ता खात असताना शासन, राज्यकर्ते, एमएसआरडीसी प्रशासन व ठेकेदार मात्र निद्रिस्त अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे. वाकण-खोपोली राज्यमहामार्ग ३९ किमी इतका लांबीचा असून या रस्त्याचे काम २०१६ पासून सुरू आहे. मात्र, आजतागायतया रस्त्याची दुरावस्था पाहता रस्त्याच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर भक्तांवर खड्ड्यांचे विघ्न ओढावले आहे. दरम्यान, रस्त्याच्या दुरवस्थेबाबत प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी कृषीवलच्या प्रतिनिधींनी एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांना संपर्क केला असता कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याचे वारंवार दिसून येत आहे. त्यामुळे जनता संकटात असताना हा विभाग नेमका कुणाच्या नियंत्रणात काम करतो? अकार्यक्षम अधिकाऱ्यांवर राज्य सरकाराचा वचक आहे की नाही? असा सवाल देखील जनतेतून उपस्थित होत आहे.

### बाप्पांच्या आगमनात गुरांचा अडथळा

**कोर्लई :** गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर आला असून जिल्ह्याभरातील कोकणवासीय मोठ्या प्रमाणावर आपल्या गावाकडे येत असतात. मात्र, मुरूड तालुक्यातील साळाव-मुरुड रस्त्यावर विविध ठिकाणी असलेली उनाड गुरे गणेश भक्तांसह वाहन चालकांची डोकेदुखी ठरत आहे. साळाव-मुरुड रस्त्यावर बोर्ली, ताराबंदर, बारशिव, काशिद, नांदगांव, मजगांव-पूल तसेच विहुर इत्यादी भागांत रस्त्यांवर



उनाड गुरांचा हैदोस सुरू असतो. रात्रीच्या वेळी रस्त्यासह पुलावर ही उनाड गुरे ठिय्या मांडतात. त्यामुळे अनेक गणेश भक्तांना वाहने चालवताना कसरत करावी लागत आहे. या पूर्वी ग्रामपंचायतीत असलेली 'कोंडवाडा' हि संकल्पना संपुष्टात आल्यामुळे व संबंधित गुरांच्या मालकांच्या दुर्लक्षामुळे रस्त्यावरील उनाड गुरे वाहन चालकांची डोकेदुखी ठरत आहेत. त्यामुळे यावर तातडीने ठोस उपाय योजना होणे अत्यंत गरजेचे असून काळाची गरज बनली आहे. यावर कोणतीही उपाय योजना न झाल्यास कोणत्याही क्षणी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायत, शासन व प्रशासनाने याप्रश्नी तातडीने लक्ष पुरवून, ठोस निर्णय घेऊन रस्त्यावरील उनाड गुरांचा कायम स्वरुपी बंदोबस्त करावा, अशी मागणी गणेश भक्त, वाहनचालक व प्रवासी वर्गातून जोर धरीत आहे.

# गणा धाव रे.. मला पाव रे...

## पारंपरिक लोककलांना जनाधार; गणेशोत्सवानिमित्त तालीम सुरू

| पाली/बेणसे | प्रतिनिधी |

**महाराष्ट्राला लोककलेची मोठी परंपरा लाभली आहे. विशेषतः कोकणात दशावतारी नाटक, शक्तीतुरा, डबलबारी, भजन, कीर्तन आणि जाखडी नृत्य किंवा बाल्या नाच या लोप पावत चाललेल्या लोककलांना पुन्हा सुगीचे दिवस येतांना दिसत आहेत. त्यामुळे गणेशोत्सवानिमित्त रायगड जिल्ह्यात गावा-गावांत लोककलांची रंगित तालीम सुरू झाली आहे.**



(छायाचित्र: धम्मशील सावंत)

श्रावणात महिलांचे मंगळगौरी खेळ, भाद्रपद महिन्यात गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव यामध्ये देखील कोकणातील प्रत्येक गावात पारंपारिक लोककला सादर होत असते. मात्र, सध्या नोकरीनिमित्त शहराकडे आलेला चाकरमानी या कलेपासून दुरावला आहे. त्यामुळे सुधागड तालुक्यातील श्री दत्त गुरु नाच मंडळ यांचा जाखडी नाच गेली २२ वर्ष बंद होता. मात्र, येथील नवतरूणांनी तो पुन्हा चालू केला आहे. चव्हाणवाडी ग्रामस्थ मंडळाने नृत्य कलाकारांची जमवाजमव सुरू केली आहे. ही कोकणातील लोककला जिवंत ठेवण्यासाठी हे मंडळ तत्पर झाले आहे. यावेळी पारंपरिक जाखडी नृत्याचा बाळकूम येथील मरू आईच्या मंदिरात शुभारंभ करण्यात आला. दर शनिवार-रविवार या मंडळाची रंगित तालिम या ठिकाणी सुरू असते. तर, ठाणे आणि भिवंडीमध्ये पुंडलिकबुवा मोरे यांच्या माध्यमातून नवीन होतकरू कलाकार मंडळींना तेजस मोरे आणि सौजस मोरे हे लोकसंगिताचे धडे देत आहेत. गावची कलाकार मंडळी फावल्या वेळात जाखडी नृत्य, शक्ती तुरा, भजन कीर्तन यात दंग होत आहेत. खरंतर लोककला जपणे आणि आपली संस्कृती टिकवणे यासाठी ही मंडळी अहोरात्र मेहनत घेतात. विषेश म्हणजे त्याच्यात मुलींचा सुद्धा सहभाग आहे.

> "आपल्या भावी पिढीला ही कला समजावी व त्यांनी देखील हि पारंपरिक कला अधिक समृद्ध करावी. त्यासाठी आपली वैयक्तिक जबाबदारी म्हणून मागील १५ वर्षांपासून बाल्या व माळी नाच ही कला जतन करत आहोत. गावातील सर्व ग्रामस्त आम्हाला प्रोत्साहन देऊन सहकार्य करतात. पारंपारीक कला टिकावी यासाठी आमचा हा छोटासा प्रयत्न आहे. गणेशोत्सव निमित्त सराव सुरू केला आहे."
>
> – समाधान म्हात्रे, तरुण कलाकार, दुरशेत

### लोककला टिकवण्यासाठी तरुणांचा पुढाकार

**आधुनिकतेच्या युगात समाजामध्ये बाल्या नाच आणि माळी नाचाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. तरुण पिढीने याकडे पाठ फिरवली आहे. त्यामुळे ही लोककला आता लोप पावत चालली आहे. आपल्या पुर्वजांची हि कला टिकावी, तिचे जतन व्हावे यासाठी पेण तालुक्यातील दुरशेत गावातील सुशिक्षीत तरुण मागील अनेक वर्षापासून स्वतः हि कला सादर करुन जोपासत आहेत. यातील अनेक तरुण पदवीधर आहेत. तर, कोणी इंजिनियर देखिल आहेत. मात्र, प्रत्येकजण तनमनधनाने कोणताही संकोच न बाळगता हि कला सादर करतात व त्यासाठी मेहनत घेत आहेत.**

# गालसुरे-साखरी रस्त्याची दुरवस्था

| श्रीवर्धन | प्रतिनिधी |

श्रीवर्धन तालुक्याला पर्यटन दृष्टीने काही वर्षांत वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. दिघीपासून कोलमांडला पर्यंतचे मुख्य रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे तर ग्रामीण भागातील अंतर्गत रस्ते जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून करण्यात आले आहेत. तालुक्यात बहुतेक भागात रस्ता रुंदीकरण व कॉंक्रिटिकरण झाल्याने प्रवास काही प्रमाणात सुखावह होत आहे. परंतु, श्रीवर्धन तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गाला जोडणाऱ्या



गालसुरे ते साखरी रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करताना वाहनचालकांसह प्रवासी वर्गाला नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रस्ते विकास योजना अंतर्गत जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून गालसुरे ते महाड खाडीपर्यंत ३.७० मीटर रूंद व १० किलोमीटर लांबीचा रस्ता करण्यात आला आहे. हा महत्त्वाचा रस्ता म्हसळा तालुक्यातील आंबेतसह रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली व मंडणगड तालुक्यातील म्हाप्रळ मार्गे महाड तालुक्याला जोडला गेला आहे. सद्यस्थितीत गालसुरे ते साखरी या ३ किलोमीटरच्या अंतरावर खड्डे पडल्याने वाहनचालकांना कसरत करत आपले वाहन मार्गस्थ करावे लागत आहे.

## स्वाती सिनकर यांचे निधन

**अलिबाग :** तालुक्यातील रामराज गावच्या रहिवासी स्वाती सिनकर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. मृत्यूसमयी त्या ५६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या अचानक निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. शेतकरी कामगार पक्षाचे अलिबाग पंचायत समितीचे माजी सदस्य सुभाष वागळे यांच्या त्या छोट्या भगिनी होत. त्यांच्यावर रामराज येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी स्वाती सिनकर यांना श्रद्धांजली वाहिली.



त्यांच्या पश्चात त्यांचे पती संदीप सिनकर, मुलगा सुश्रुत आणि मुलगी सई यांच्यासह सिनकर आप्तेष्ट असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी सोमवारी (दि.१) तर उत्तर कार्य गुरुवारी (दि.४) रामराज येथील राहत्या घरी होणार आहेत.



# बोटी निघाल्या दर्यात

| आगरदांडा | प्रतिनिधी |

हवामानात अचानक बदल झाल्यामुळे वादळी पाऊस, सोसाट्याच्या वारा व समुद्र खवळल्याने मासेमारी करिता गेलेल्या ठिक ठिकाणच्या १५० बोटी आगरदांडा व दिघी बंदरात अश्रायला आल्या होत्या. मात्र, ५ दिवसांच्या प्रतीक्षेनंतर हवामानाचा अंदाज घेत 'वल्हवरे नाखवा वल्हव वल्हव' करत बोटी पुन्हा मासेमारी करिता दर्यात निघाल्याने कोळी बांधवांमध्ये उत्साह दिसुन येत आहे.

मासेमारी बंदी उठल्यानंतर कोळी बांधवांनी १ ऑगस्ट पासून मासेमारीला सुरूवात केली. परंतु, अचानक जोरदार वाऱ्यासह पाऊस पडत असल्यामुळे समुद्रात गेलेल्या सुमारे १५० मासेमारी बोटी मुरुड तालुक्यातील आगरदांडा व श्रीवर्धन तालुक्यातील दिघी बंदराजवळील समुद्रात विसावल्या होत्या. त्यामध्ये राजपुरी, मुरुड-एकदरा व दिघीच्या ५९ बोटी, वेरावळ-गुजरातच्या ४० बोटी, रत्नागिरीतील पाजपंढरी व हरणाईच्या ३५ बोटी, अलिबागच्या ८ बोटी, तर मुंबईतील वर्सोवाच्या ८ बोटी नांगर टाकून अश्रायला थांबल्या होत्या. अखेर, रविवारी (दि.२४) पाचव्या दिवशी सकाळपासून आकाशात शुभ्र ढग दिसू लागल्याने हवामानाचा अंदाज घेत नाखवांनी नांगरलेल्या बोटीचे नांगर उचलून पुन्हा आपल्या बोटी खोल समुद्रात मासेमारी करिता रवाना केल्या आहेत.

> "वादळी वाऱ्यासह पाऊस त्यात समुद्र खवळत असल्याने मासेमारी करिता गेलेल्या बोटींनी आगरदांडा व दिघी बंदराजवळ समुद्रात नांगर टाकुन अश्राय घेतला होता. आम्ही या ठिकाणी भेट देऊन विचारपूस केली होती. तसेच, सुरक्षेच्या दृष्टीने बोटींच्या कागदपत्रांची देखील तपासणी केली होती. बोटीतील नाखवांनी हवामानाचा अंदाज घेऊन बोटी पुन्हा समुद्रात मासेमारी करिता सोडल्या आहेत. मात्र, काही स्थानिक बोटी अजूनही आगरदांडा बंदराजवळ उभ्या आहेत."
>
> –अक्षय साळुंखे, सहाय्यक मत्स्यव्यवसाय विकास तथा परवाना अधिकारी




### सुधागड तालुक्यात पुन्हा चोरी

| पाली/ वाघोशी | प्रतिनिधी |

सुधागड तालुक्यातील घोटावडे गावातील विहिरीतून पाणी टाकीत भरून पुरवले जाते. यासाठी ग्रामपंचायतीकडून मोटार लावण्यात आली. मात्र, मोटारची वायर सतत चोरीला जात असून, याआधी देखील ग्रामस्थांनी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली होती. तरीदेखील पोलिसांनी कोणतीही कार्यवाही न केल्याने चोरांचे मनोबल वाढल्याचे ग्रामस्थांचे मत आहे. गावकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत असलेल्या या मोटारीची वायर वारंवार चोरीस जाणे हा गावासाठी मोठा डोकेदुखीचा विषय बनला आहे. पोलिसांनी चोरट्यांना पकडले नाही, तर ग्रामस्थांना रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा देण्यात आला आहे.









# जिंकण्यासाठी वाट्टेल ते

देशात दंगली होवोत की दुसऱ्या देशाशी लढाई, भाजपवाले हरेक गोष्टीचे राजकारण करीत असतात. ते उपराष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचा मौका सोडणे शक्यच नाही. वास्तविक राष्ट्रपती, उपराष्ट्रपती ही घटनात्मक पदे आहेत. त्यात सत्ताधारी पक्ष आपल्या मर्जीतल्याच लोकांची वर्णी लावणार हे गृहित असले तरी अशा पदांवर शक्यतो विद्वान, अनुभवी व सर्वांना आदर वाटेल अशा व्यक्तीला निवडण्याचा संकेत आहे. त्यामुळे त्यांच्या निवडणुकीतील प्रचारही सहसा संयतपणे केला जातो. पण सभ्यतेचे सर्व संकेत मोडायचे हेच मुळी भाजपने ठरवलेले आहे. पूर्वी काँग्रेसच्या काळात निवडले गेलेले उपराष्ट्रपती हमीद अन्सारी यांना ते मुस्लिम असल्याने नरेंद्र मोदी सरकारने अत्यंत वाईट वागणूक दिली. त्यांच्या निरोपाची भाषणे करतानाही मोदींनी त्यांच्याविषयी असभ्य भाषा वापरली. आता नऊ सप्टेंबरला होणाऱ्या उपराष्ट्रपतिपदाची निवडणुकीसाठीही भाजपने असाच विखारी प्रचार सुरू केला आहे. वास्तविक ही निवडणूक तशी औपचारिकच आहे. लोकसभा व राज्यसभेतील खासदार हे या निवडणुकीतले मतदार असतात. सध्या एकूण ७८२ खासदार मतदान आहेत. विजयासाठी किमान ३९२ मतांची गरज असेल. भाजप आघाडीकडे लोकसभेत २९३ व राज्यसभेत १३३ असे मिळून ४२६ खासदार किंवा मते आहेत. भाजप आघाडीत फूट पडण्याची सध्या कोणतीही शक्यता दिसत नाही. चंद्राबाबू नायडू, नीतीशकुमार हे दोन मुख्य सहकारी पक्ष आहेत. त्यांनी आपला पाठिंबा भाजपचे उमेदवार राधाकृष्णन यांनाच राहील हे स्पष्ट केले आहे. तरीही भाजपवाल्यांनी आपले नेहमीचे गेम खेळण्यास सुरुवात केली आहे. भाजप आघाडीचे उमेदवार राधाकृष्णन हे महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत. त्यामुळे त्यांचे मतदान मुंबईतले असल्याने महाराष्ट्राचे समजून सर्व विरोधकांनीही त्यांनाच मतदान करावे असे आवाहन करण्याचा प्रयत्न देवेंद्र फडणवीस यांनी केला. त्यासाठी त्यांनी थेट शरद पवार व उद्धव ठाकरे यांना फोन केले. त्या दोघांनीही ही मागणी ताबडतोब फेटाळून लावली असली तरी आता आपल्यातच फाटाफूट होणार नाही याची काळजी विरोधकांना घ्यावी लागणार आहे. कारण, देवेंद्रांची ही भाषा म्हणजे मते फोडण्याचा जवळपास इशाराच आहे.

### तमिळनाडूतील समीकरणे

पवार यांनी राधाकृष्णन हे आमच्या विचाराचे नाहीत, सबब पाठिंबा नाही असे स्पष्ट केले. तर आधी पक्ष फोडायचे आणि नंतर त्यांचाच पाठिंबा मागायचा ही कोणती रीत असा सवाल करून संजय राऊत यांनी भाजपला आपण जुने हिशेब विसरलेलो नाही याची आठवण करून दिली. इतर राज्यांमध्येही भाजपने हाच फंडा वापरण्याचा प्रयत्न केला. तमीळनाडूत राधाकृष्णन हे तमीळ असल्याने सर्व खासदारांनी त्यांना मतदान करावे असे आवाहन करण्यात आले. पण द्रवीड मुन्नेत्र कळघमने ते उडवून लावले. यात मेख अशी आहे की, राधाकृष्णन यांना ही उमेदवारीच मुळात द्रमुकला शह देण्यासाठी दिली गेली आहे. राधाकृष्णन हे वयाच्या सोळाव्या वर्षापासून संघ स्वयंसेवक असून दोन वेळा कोईमतूरमधून निवडून आलेले आहेत. कोईमतूर हा तमिळनाडूचा घाटमाथ्याचा प्रदेश आहे. या भागात गोंडर जातीचे प्राबल्य आहे. तेथील तिरुपूरचा वस्त्रोद्योग याच जातीच्या हातात आहे. या उद्योगाची उलाढाल सुमारे चाळीस हजार कोटींची आहे. पश्चिम महाराष्ट्रातील साखर धंद्यातील उद्यमशील मराठा किंवा गुजरातेतील पटेल यांच्याशी या गोंडर यांचे साधर्म्य आहे. तमिळनाडूमध्ये अन्यत्र राजकारणात मागास जातींचे वर्चस्व आहे. पण कोईमतूर पट्ट्यात गोंडर अधिक प्रभावी आहेत. गोंडर हे त्यातल्या त्यात पुढारलेले व भाजपच्या बाजूला झुकलेले आहेत. त्यामुळेच कोईमतूरमधून तमिळनाडूच्या गडाला खिंडार पाडण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. याखेरीज इतर मागास जातींपैकी काहींना आपल्यासोबत घ्यायचे प्रयत्नही चालू आहेतच. यामधून राज्यातला किमान दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष होण्याचे भाजपचे स्वप्न आहे. यातली मेख अशी की, आजवर द्रमुक आणि जयललितांचा अद्रमुक या दोघांमध्येच मुख्य लढत होती. आता भाजपने अण्णा द्रमुला जवळपास संपवले आहे. त्या पक्षात प्रबळ नेता राहणार नाही याची काळजी घेण्यात आली आहे. त्या पक्षाच्या बाजूने असलेले ब्राह्मण, नाडर व गोंडर आता भाजपकडे येतील. याचा परिणाम पुढच्या वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत नक्कीच दिसून येईल.

### शाह यांचे बेलगाम आरोप

हेही एक परवडले. पण भाजपने सध्याच्या निवडणुकीच्या निमित्ताने विरोधकांचे उमेदवार सुदर्शन रेड्डी यांच्याविरुध्द जो प्रचार चालू केला आहे तो अत्यंत धोकादायक व लोकशाहीला घातक आहे. रेड्डी हे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश आहेत. २०११ मध्ये त्यांनी सलवा जुडूमच्या विरोधात दिलेल्या एका निकालाला धरून केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यांच्यावर नक्षलवाद्यांना मदत करणारे असल्याचा आरोप केला आहे. घटनात्मक पदासाठीच्या निवडणुकीत अशा खालच्या तऱ्हेचा प्रचार व्हावा हे अत्यंत लाजिरवाणे आहे. सलवा जुडूम ही नक्षलवाद्यांच्या विरोधातली छत्तीसगड सरकारची मोहीम होती. स्थानिक आदिवासीं तरुणांमधूनच फौज उभी करायची व त्यांना नक्षलवाद्यांविरुध्द लढवायचे अशी ही कल्पना होती. यामध्ये प्रचंड पैसा व गुंडगिरीचा वापर झाला. नंतर नक्षल आहे या संशयावरून किंवा आपसातले हिशेब चुकते करण्यासाठी लोकांना मारणे सुरू झाले. स्थानिक आदिवासींना भयंकर भ्रष्ट अशा सवयी लावण्यात आल्या.. त्यात नक्षलवाद्यांनी केलेल्या प्रत्युत्तराच्या हल्ल्यांमध्येही खूप जण मारले गेले. एकूण सलवा जुडूम म्हणजे रक्तरंजित व भ्रष्ट कालखंड होता. याविरुध्द सर्वोच्च न्यायालयात दावा दाखल होता. न्यायालयासमोर जे पुरावे आले त्यानुसार त्यांनी निर्णय दिला व सलवा जुडुमवर बंदी घातली. आता अमित शाह असा आरोप करीत आहेत की रेड्डी यांनी ती बंदी घातल्यामुळे नक्षलवाद आणखी फोफावला. अन्यथा, तो २०२०मध्येच संपुष्टात आला असता. मुद्दा असा आहे की, नक्षलवाद संपवणे म्हणजे गोरगरीब आदिवसींना संपवणे नव्हे. सलवा जुडुम हा लोकशाहीविरोधी, दहशतवादी व खुनशी प्रकार होता. त्याबाबत न्यायायलाने जो निर्णय दिला त्यावर देशाच्या गृहमंत्र्याने हेतूचे आरोप करणे हे अत्यंत गंभीर आहे. खरे तर याबाबत शाह यांच्यावर खटला भरला जायला हवा. दुसरे म्हणजे रेड्डी यांनी बंदी घातली नसती तर अमुक दिवसात नक्षलवाद संपला असता असे म्हणणे हे हास्यास्पद आहे. काश्मीरमधला दहशतवाद संपवण्यासाठी मोदींनी नोटबंदी केली आणि शाह यांनी ३७०वे कलम रद्द केले. अजूनही काश्मीर धुमसते आहेच. शिवाय, भाजपवाले काश्मीरला राज्य म्हणून पूर्वीचे अधिकार बहाल करायलाही तयार नाहीत. शाह यांच्याच काळात पठाणकोट, पुलवामा आणि पहलगामचे हल्ले झाले. पहलगामच्या हल्ल्याच्या वेळी कोणतीही सुरक्षा नव्हती व नंतर दोन महिने अतिरेक्यांचा काहीही पत्ता लागला नव्हता. हे ज्यांचे कर्तृत्व आहे ते अमित शाह असले आरोप करतात हेच आक्षेपार्ह आहे. पण निवडणूक जिंकण्याच्या राक्षसी इच्छेपाई भाजपवाल्यांनी देशातील लोकशाहीची वाट लावली आहे. त्यातलेच हे आणखी एक प्रकरण आहे.

## विचार

# सेमीकंडक्टर उत्पादनांत आत्मनिर्भरता येणार

***पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनी राष्ट्राला संबोधित करताना या वर्षाअखेर देशातील पहिली सेमीकंडक्टर चिप उत्पादित होणार असल्याची घोषणा केली. आतापर्यंत परदेशातून सेमीकंडक्टर आयात करून भारताची गरज भागविली जात होती. दहा वर्षात सेमीकंडक्टर उत्पादनात स्वयंपूर्ण होण्याचा भारताचा निर्धार असून सेमीकंडक्टर निर्यात करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे.***

**प्रा.एम.आर. बखळे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला संबोधित करताना देश सेमीकंडक्टरच्या जगात पुढे जात आहे, असे सांगितले. देशात सहा सेमीकंडक्टर युनिट्स आधीच कार्यरत आहेत, तर इतर चार मंजूर झाले आहेत. २०२५ च्या अखेरीस 'मेड इन इंडिया' सेमीकंडक्टर चिप्स बाजारात येतील. सेमीकंडक्टर चिप्ससाठी देशांमध्ये अनेकदा संघर्ष होतो. अशा परिस्थितीत सेमीकंडक्टर चिप म्हणजे काय हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. हा एक सिलिकॉन-आधारित इलेक्ट्रॉनिक घटक आहे, जो कोणत्याही उपकरणाच्या प्रक्रियेत आणि मेमरी स्टोरेजमध्ये वापरला जातो. सोप्या भाषेत सांगायचे तर फोनमध्ये स्थापित केलेली मेमरी चिप त्याचाच एक प्रकार आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सेमीकंडक्टर चिप्स लहान असूनही खूप उपयुक्त आहेत. त्याशिवाय कोणतेही गॅझेट काम करू शकत नाही. ते मोबाईल, लॅपटॉपपासून वाहन, संरक्षण आणि उपग्रह क्षेत्रात वापरले जाते. तैवान जगात सर्वाधिक सेमीकंडक्टर चिप्स बनवतो. या देशातील 'टीएसएमसी' या कंपनीचा चिप मार्केटमध्ये सुमारे ५० टक्के वाटा आहे.

मेमरी चिप्स बनवणारी दक्षिण कोरिया दुसऱ्या क्रमांकावर आहे. सॅमसंग, एसके हायनिक्स सारख्या कंपन्या यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. चीनदेखील हळूहळू या क्षेत्रात प्रगती करत आहे. 'मीडिया रिपोर्टस'नुसार सेमीकंडक्टर चिप्सच्या एकूण उत्पादनात चीनचा वाटा सुमारे १५-२० टक्के आहे. चिपचा शोध अमेरिकेने लावला होता; परंतु आजकाल बहुतेक आशियाई देश त्याचे उत्पादन करत आहेत. अशा परिस्थितीत अमेरिकादेखील या क्षेत्रात सतत गुंतवणूक करत आहे आणि इंटेल, मायक्रोनसारख्या कंपन्या महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. किओक्सिया आणि रेनेसास या जपानी टेक कंपन्या आहेत, ज्या या क्षेत्रात सतत पुढे जात आहेत. जपानमध्ये सेमीकंडक्टर बनवण्यासाठी कच्च्या मालाशी संबंधित शंभर युनिट्स आहेत. त्यामुळे ते मजबूत बनते.

सर्वाधिक सेमीकंडक्टर चिप्स खरेदी करणाऱ्या देशांच्या यादीत पहिले नाव चीनचे आहे. जे त्याच्या इलेक्ट्रॉनिक बाजारपेठेसाठी एकूण जागतिक खरेदीपैकी एक तृतीयांश खरेदी करते, तर अमेरिका दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारत त्याच्या गरजेनुसार इतर देशांकडून लागणारे शंभर टक्के सेमीकंडक्टर खरेदी करतो. त्यात तैवान हा सर्वात मोठा पुरवठादार आहे. त्यानंतर चीन, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम आणि मलेशियाचा क्रमांक लागतो. एका अहवालानुसार भारत स्वतः सेमीकंडक्टर निर्यात करतो. २०२४-२५ दरम्यान भारत अमेरिकेला चिप्स निर्यात करणारा चौथा देश आहे, ज्याचा अमेरिकेच्या एकूण सेमीकंडक्टर आयातीत ७.२ टक्के वाटा आहे. भारत अर्धवाहक उत्पादन आणि नवोपक्रमाचे जागतिक केंद्र बनण्याचे स्वप्न पाहतो, जेणेकरून आयात कमी होईल आणि पुरवठा साखळी मजबूत होईल आणि देशांतर्गत क्षमता वाढेल.

सरकारने 'सेमीकॉन इंडिया प्रोग्राम' अंतर्गत या क्षेत्रात सुमारे ७६ हजार कोटी रुपये जारी केले आहेत. आतापर्यंत देशात दहा प्रमुख अर्धवाहक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे, जिथे ६ प्लांटवर काम सुरू आहे. टाटा इलेक्ट्रॉनिक्स, एचसीएल-फॉक्सकॉन, मायक्रॉन, वेदांत-फॉक्सकॉन आणि अनेक जागतिक तंत्रज्ञान कंपन्या यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. भारत २०२५ च्या अखेरीस 'मेड इन इंडिया' सेमीकंडक्टर चिप्स लाँच करण्याची तयारी करत आहे. भारत सरकार 'सेमिकॉन इंडिया फ्युचर स्किल्स टॅलेंट कमिटी'च्या अहवालाकडे लक्ष ठेवून आहे. त्यात म्हटले आहे की २०३२ पर्यंत 'व्हेरी लार्ज स्केल इंटिग्रेशन' (व्हीएलएसआय) चिप डिझाइन क्षेत्रात अंदाजे २,७५,००० अतिरिक्त कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल. इतकेच नाही तर, पुढील दहा वर्षांमध्ये फॅब (फॅब्रिकेशन प्रोसेस) आणि एटीएमपी (असेंब्ली, टेस्टिंग, मार्किंग आणि पॅकेजिंग) सुविधांसाठी अनुक्रमे २५ हजार आणि २९ हजार कुशल कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल. या आवश्यकतेच्या तुलनेत, सध्या देशात कुशल कामगारांची उपलब्धता आणि तयारीची गती खूपच कमी आहे. हे लक्षात घेता कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाने 'इंडिया सेमीकंडक्टर इकोसिस्टीम वर्कफोर्स डेव्हलपमेंट स्ट्रॅटेजी रिपोर्ट' तयार केला आहे. त्यात विविध शिफारशींसह एक रोडमॅप सुचवण्यात आला आहे, ज्याची अंमलबजावणी करण्यास सरकार तयार आहे. दर वर्षी १५ लाखांहून अधिक अभियंत्यांना प्रशिक्षण दिले जाते.

भारतीय अर्धवाहक उद्योगाची सद्यस्थिती आणि भविष्यातील शक्यतांवरील हा अहवाल अलिकडेच कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी लाँच केला. अहवालात दावा करण्यात आला आहे की भारतात दर वर्षी १.५ दशलक्षाहून अधिक अभियंते प्रशिक्षित केले जातात. त्यापैकी तीन टक्क्यांपेक्षा कमी अर्धवाहक उद्योगासाठी कुशल मानले जातात. तथापि, गेल्या काही वर्षांमध्ये भारताने चिप डिझाइनमध्ये बरीच प्रगती केली आहे, परिणामी सव्वा लाखांहून अधिक अभियंते डिझाइन सेवांमध्ये गुंतले आहेत, तरीही फॅब ऑपरेटर, प्रक्रिया तंत्रज्ञ आणि एटीएमपी अभियंत्यांची मोठी कमतरता आहे. संपूर्ण अर्धवाहक मूल्य साखळीसाठी हे कौशल्य आवश्यक आहे. भारत सर्वात वेगाने वाढणाऱ्या डिजिटल अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि अर्धवाहक उद्योग त्यात खूप मोठी भूमिका बजावू शकतो. इलेक्ट्रॉनिक्स आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या वाढत्या मागणीमुळे भारतातील सेमीकंडक्टर बाजारपेठ २०२१ मध्ये २७ अब्ज डॉलर्सवरून २०२६ पर्यंत ६४ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे.

हे लक्षात घेता, सरकारने सेमीकंडक्टर डिझाइन, उत्पादन आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ७६ हजार कोटी रुपयांच्या बजेटसह 'सेमीकॉन इंडिया' कार्यक्रम सुरू केला आहे. या सरकारी अहवालात मॅकेन्झी यांच्या 'द सेमीकंडक्टर डिकेड : अ ट्रिलियन-डॉलर इंडस्ट्री' या अहवालाचाही उल्लेख आहे, त्यानुसार सेमीकंडक्टर उद्योगातील ही भरभराट आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय), इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), रोबोटिक्स आणि ५जी सारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा व्यापक अवलंब आणि वाढीव डेटा प्रोसेसिंग, स्टोरेज आणि ट्रान्समिशन क्षमतेच्या मागणीमुळे झाली आहे.

भारतीय सेमीकंडक्टर बाजारपेठ २०२० मध्ये १५ अब्ज डॉलर्स होती. २०२५ पर्यंत ती ६४ अब्ज डॉलर्स तर २०३० पर्यंत ११० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. ती जागतिक मागणीच्या सुमारे दहा टक्के आहे. कौशल्य विकास तज्ज्ञांनी अहवालात म्हटले आहे की सेमीकंडक्टर उद्योगासाठी कोणालाही तयार करण्यासाठी विविध विषयांमध्ये मजबूत पाया आवश्यक आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, विद्युत अभियांत्रिकी आणि संगणक विज्ञानाच्या मूलभूत गोष्टी समजून घेऊन, विद्यार्थी अर्धवाहक उपकरणे, उत्पादन प्रक्रिया, डिझाइन तंत्रे एक्सप्लोर करण्यासाठी तयार होऊ शकतो. नॅनोटेक्नॉलॉजी, मटेरियल सायन्स आणि सर्किट डिझाइन यासारख्या विशिष्ट क्षेत्रातही हळूहळू पुढे जाऊ शकतो. या धोरण अहवालात, तज्ज्ञांनी शालेय स्तरावरूनच काही तांत्रिक अभ्यासक्रम सुरू करण्याचे सुचवले आहे.

हे विविध मंत्रालयांशी संबंधित असल्याने, कौशल्य विकास मंत्रालय या सर्व मंत्रालयांच्या सहकार्याने या धोरणावर आणि रोडमॅपवर पुढे जाण्यासाठी पुढाकार घेत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी सेमीकंडक्टर आहेत आणि चिप्सची जागतिक मागणी गगनाला भिडत आहे; परंतु काही मर्यादित भौगोलिक क्षेत्रांमध्ये उद्योगाचे केंद्रीकरण झाल्यामुळे पुरवठा साखळी खूपच नाजूक आहे. त्याच वेळी, उत्पादनाच्या जागतिक विविधीकरणाची मोठी आवश्यकता आहे. भारत या संदर्भात एक प्रमुख खेळाडू म्हणून उदयास येत आहे. 'मेक इन इंडिया'अंतर्गत 'इलेक्ट्रॉनिक्स सिस्टीम डिझाइन अँड मॅन्युफॅक्चरिंग' (ईएसडीएम), 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन' (चिप डिझाइन स्टार्टअप्स इंडिया) आणि 'सेमीकॉन इंडिया प्रोग्राम' यासारख्या प्रमुख क्षेत्रांपैकी एक म्हणून उपक्रमांनी उद्योगाला आधार देण्यासाठी एक परिसंस्था तयार करण्यास मदत केली आहे. जागतिक सेमीकंडक्टर (सेमीकंडक्टर इनोव्हेशन इंडिया) बाजारपेठ २०३० पर्यंत एक ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. त्यात भारताच्या बाजारपेठेचा मोठा वाटा असेल. नोएडा आणि बेंगळुरू येथे दोन अत्याधुनिक सेमीकंडक्टर डिझाइन सुविधा केंद्रांचे उद्घाटन झाले आहे. ही भारतातील पहिली केंद्रे प्रगत ३ नॅनोमीटर चिप डिझाइनवर लक्ष केंद्रित करतात. देशाच्या सेमीकंडक्टर इनोव्हेशन प्रवासात हा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. मंत्रालयाच्या 'डिझाइन लिंक्ड इन्सेंटिव्ह' (डीएलआय) योजनेअंतर्गत समर्थित स्टार्टअप्स आणि त्यांच्या 'चिप्स टू स्टार्टअप्स' (सी २ एस) कार्यक्रमात लक्षणीय वाढ होत आहे. अलीकडेच 'स्मार्ट व्हिजन', सीसीटीव्ही कॅमेरे आणि 'इंटरनेट ऑफ थिंग्ज'सारख्या अनुप्रयोगांसाठी चिप्स बनवणाऱ्या नेत्रासेमी या स्टार्टअप कंपनीला सरकारच्या चिप डिझाइन योजनेंतर्गत १०७ कोटी रुपयांची व्हेंचर कॅपिटल गुंतवणूक मिळाली. मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार २०२२ मध्ये 'डीएलआय' योजना सुरू झाल्यापासून सरकारने २२ कंपन्यांना चिप डिझाइन प्रकल्पांसाठी २३४ कोटी रुपयांची मदत देण्याचे वचन दिले होते. त्याचा एकूण प्रकल्प खर्च ६९० कोटी रुपये आहे. एकत्रितपणे या स्टार्टअप्सनी व्हेंचर कॅपिटल गुंतवणूकदारांकडून ३८० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी उभारला आहे. याव्यतिरिक्त, पाच स्टार्टअप्सनी जागतिक चिप उत्पादकांसह त्यांचे चिप डिझाइन आधीच तयार केले असून त्यांची चाचणी केली आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार ७२ हून अधिक कंपन्यांना चिप्स डिझाइन करण्यास मदत करण्यासाठी प्रगत सॉफ्टवेअर साधनांची उपलब्धता प्रदान करण्यात आली आहे.

**(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)**

## चर्चा आजची

# बाप्पा पाहणाऱ्याच्या भक्तीत असावा..

**वैष्णवी वाडकर**

'मोरया रे बाप्पा मोरया रे' चे सूर अवघ्या २ दिवसांत आपल्या कानात घुमणार आहेत. दुपारची आरती, रात्रीची आरती आणि जागरणाचे भजन यातच गणेश भक्त रमून जाणार आहेत. पुढील १० दिवस म्हणजे एकदम उत्साहाचे आणि आनंदाचे ठरणार आहेत. कारण सर्वांचे लाडके गणपती बाप्पा प्रत्येकाच्या घरी येणार आहेत. त्यामुळे बाप्पाच्या आगमनाची जोरदार तयारी सुरु आहे. बाप्पा येणार म्हणजे त्याच्यासाठी सगळं परिपूर्ण हवं. मात्र, बाप्पा दरवर्षी वेगळ्या शैलीत हवा, असं का? तो त्याच्या मुळ रूपात अन् पाहणाऱ्याच्या भक्तित असावा, असे प्रश्न सध्या उपस्थित होत आहेत.

दरवर्षीप्रमाणे यंदाही गणपती बाप्पाचे आगमन २७ ऑगस्ट रोजी होणार आहे. बाप्पाच्या आगमनाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. शहरांतील विविध बाजारपेठांमध्ये फळे, फुले, पूजेचे साहित्य त्याचबरोबर डेकोरेशनसाठी लागणारी प्लास्टिकची फुले, विद्युत रोशनाईच्या तारा व इतर सामान घेण्यासाठी ग्राहकांची गर्दी होत आहे. यंदा रायगड जिल्ह्यात एकूण १ लाख २ हजार ४८४ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सगळ्या गणेश मूर्तींची शैली वेगवेगळी असणार आहे. कारण बाप्पाची अनेक रूपं आहेत. दरवर्षी काही तरी हटके हवं म्हणून बाप्पाच्या मूर्ती वेगवेगळ्या शैलीत घडवल्या जातात.

शास्त्रीय मुद्गल पुराण व श्रीतत्वनिधी या ग्रंथांमध्ये गणेशाच्या ३२ रूपांचा व ८ अवतारांचा उल्लेख केलेला आहे. गणेशाचे मुद्गल पुराणानुसार वक्रतुंड, एकदंत, महोदर, गजानन, लंबोदर, विकट, विघ्नराज, धुम्रवर्ण असे एकूण ८ अवतार आहेत. प्रत्येक अवताराचा उद्देश असुरांचा नाश आणि भक्तांचे रक्षण करणे हा आहे. त्याचप्रमाणे, गणेशाची ३२ रूपे (त्र्यांशी गणपति) शास्त्रीय आणि प्रतिमाशास्त्रानुसार आहेत. प्रतिमाशास्त्र म्हणजे मूर्ती, चित्र किंवा रूपाचे मुख, हात, आसन, शस्त्र, रंग आणि प्रतिकात्मक अर्थ याबाबत शास्त्रानुसार ठराविक नियम हे आहे. त्यामुळे भक्तांना ध्यान, पूजा आणि साधनेसाठी मार्गदर्शन मिळते.

मुंबईतील गणपती आगमन म्हणजे एक दिमाखदार सोहळाच असतो. ढोलताशा, गुलाल, फुले, भक्तांचे मनमुराद नाचन, शिस्तबद्ध आयोजन अशा पद्धतीने बाप्पाचे स्वागत केले जाते. मुंबईतील सार्वजनिक गणेश मंडळांचे गणपती उंच व आकर्षक असतात. ऑगस्ट महिन्याच्या सुरूवातीपासूनच मुंबईतील सार्वजनिक गणेश मंडळाच्या गणपतींचे आगमन होत आहे. प्रत्येक मंडळाच्या मूर्तीचे त्याचबरोबर सजावटीचे स्वतःचे असे वैशिष्ट्य असते. मात्र, या सगळ्या हटकेपणा व दिखाव्यात आपण गणपती बाप्पाचा साधं व निरागस रूप विसरत चाललो आहोत.

बाप्पाची निर्मिती ही आई पार्वतीच्या अंगाच्या मळातून झाली असून हत्तीचे धड जोडून त्यांच्यात प्राण टाकण्यात आले. हेच त्यांचे खरे रूप आहे. हल्ली ज्या रूपात आपण बाप्पाची मूर्ती घडवतो ते खरे रूप नाही. आपण त्यांना आपल्याल्या वाटेल तसे म्हणजेच ट्रेन्डप्रमाणे एखाद्या शैलीत घडवतो. आकर्षक मूर्तींच्या नावावर सिनेमातील नायक, पोलीस, डॉक्टर अशा मानवी रूपांसह कृष्ण, स्वामी समर्थ, बालाजी, विठ्ठल, साईबाबा अशा देवांची रचना देखील देतो. देवतांची रचना आपण एकवेळ मान्य सुद्धा करतो, कारण बाप्पाही त्याच देवांचा अंश आहे, अशी आपली भावना असते. मात्र, देवाला मानवी रूप का द्यावे? असा प्रश्न सध्या उद्भवत आहे. गेल्या दोन वर्षांपासून बाप्पाला पुष्पा, पोलीस, डॉक्टर तर हिंदू-मुस्लिम एकतेच्या नावाखाली मुस्लिम बाप्पा देखील बनवण्यात आला आहे.

देव जर खरंच मानवी रूप घ्यायला लागला, पुष्पा व्हायला लागला तर मग माणसात आणि देवात फरक तो काय? नुकतेच सोशल मीडियावर एक गणेशमूर्ती चर्चेचा विषय बनली आहे. मुंबई उपनगरातील मलाड पश्चिम येथील मालवणी म्हाडाच्या राजाचे काही दिवसांपुर्वी आगमन झाले. या मूर्तीचे फोटो सर्वत्र पसरत आहेत. मालवणी म्हाडाच्या राजाला साईबाबांचे स्वरूप देण्यात आले आहे. या मूर्तीबाबतची लक्षवेधक गोष्ट अशी की, बाप्पाच्या हातावर लाल रंगाने ओम काढले असून सोबत क्रॉस व अर्धचंद्र जोडलेले आहे. हा गणपती एकतेचे प्रतीक आहे, असे म्हटले जातं आहे. मात्र, सोशल मीडियावर गणपतीला गणतीचेच रूप द्या, गणपती गणपतीचं राहू द्या, अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत.

दरम्यान, सोशल मीडियावर ईशान गोडसे नावाच्या क्रिएटरने बाप्पाची एक मूर्ती हाताने बनवली व त्याचा व्हिडिओ पोस्ट केला. त्यावर त्याला एका व्यक्तीने कंमेंट केली की, याच्यापेक्षा विकत गणपती आणा. त्यावर त्यांनी प्रतिक्रिया दिली की, हो मान्य आहे, आमचा गणपती सुबक नाही. परंतु, गणपती फक्त सुबकतेत राहत नसून, तो पाहणाऱ्याच्या भक्तीत असतो. म्हणजेच काय तर बाप्पा विषयी निस्सीम भक्ती व त्याचा मूळ रूपावर आपल्याला प्रेम करता यायला हवे. त्याची मनोभावे पूजा करता यावी. गणपतीची मूर्ती हत्तीमुख अन् मानवी शरीराची असते. त्याचे चार हात असतात, ज्यात तो अंकुश, पाश, मोदक किंवा कमळ धरलेला दिसतो. तो कमळावर, सिंहासनावर किंवा जमिनीवर बसलेला असतो आणि चेहरा नेहमी आनंदी आणि शांत असतो. हा आनंदी चेहरा आणि साधेपण हेच गणपतीचे खरे रूप आहे. त्यामुळे बाप्पाला ट्रेंड किंवा विविध शैलीत न बदलता, त्याचे मूळ रूप जसे आहे तसे स्वीकारून मनोभावे भक्ती करावी.

## लोकसंसद

### पावित्र्याने भारलेल्या गणेशोत्सवात धिंगाणा नको



लाडक्या गणपती बाप्पांचे आगमन अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपले आहे. जनमानसात उत्साहाची लहर उमटली आहे. खरे तर गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा सर्वात मोठा सण-उत्सव! म्हणूनच मराठी जणांच्या या प्रिय गणेशोत्सवाला या वर्षी राजमान्यताही मिळाली आहे आणि यंदापासून गणेशोत्सव 'महाराष्ट्र राज्य महोत्सव' म्हणून अधिकृतपणे साजरा करण्यात येत आहे. या उत्सवासाठी सरकारकडून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दुसरीकडे उत्साहाला उधाण आले असून बाजारपेठा गणेशभक्तांनी फुलून गेल्या आहेत. असे सर्व आनंददायी वातावरण असले तरी सध्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे स्वरूप पहिल्यासारखे राहिलेले नाही. आनंदाच्या, उत्साहाच्या वातावरणात धर्म, संस्कृती, प्रथा आणि परंपरा जपली जाण्याची अपेक्षा असते. परंतु गणेशोत्सवात काही अपवाद वगळता सध्या सर्वत्र डीजे, डॉल्बीचा अतिरेकी वापर केला जातो. लाऊड स्पीकरवर भक्ती गीतांऐवजी हिंदी सिनेमांची कर्णकर्कश गाणी लावून ध्वनी प्रदूषण केले जाते. याचा ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, रुग्ण, पशुपक्षी यांना अतिशय त्रास होतो. काही ठिकाणी रस्ते आणि फुटपाथ अडवून मांडव टाकले जातात. त्यामुळे वाहतूक कोंडी होते. विशेष म्हणजे ज्या तरुण पिढीने या सण, उत्सवांना, संस्कृतीला, परंपरेला पुढे न्यायचे आहे ती तरुण पिढी अशा अपारंपरिक गोष्टींमध्ये सामील झालेली दिसून येते. अशावेळी पावित्र्याने भारलेल्या गणेशोत्सवात धूमशान, धिंगाणा नको अशी भाविकांची आणि सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

**-प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# सुवर्णअक्षरांचे सप्तसूर!

जाहिरातींचे जिंगल सम्राट म्हणून ओळख असलेल्या अशोक पत्की यांचा जन्म २५ ऑगस्ट १९४१ रोजी झाला. मराठी चित्रपटांतील अनेक गाण्यांसाठी त्यांनी संगीतकार म्हणून काम केलं आहे. तुकाराम, आईशप्पथ, भेट, आनंदाचं झाड, शुभमंगल सावधान, मी सिंधुताई सपकाळ, गलगले निघाले, बिनधास्त या चित्रपटांसाठी त्यांनी संगीतकार म्हणून काम केलं आहे. सर्वश्रेष्ठ संगीत दिग्दर्शनासाठीचा राष्ट्रीय पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. सप्तसूर माझे हे त्यांचं आत्मचरित्रही खूप लोकप्रिय आहे. त्यांचे वडील गिरणी कामगार. मध्यम वर्गीय कुटुंब. खेतवाडीतल्या चाळीत घर. गोवा हिंदू असोसिएशनचा जमाना. संगीत नाटकासाठी पेटीवाल्याचा शोध सुरू होता. पंडित जितेंद्र अभिषेकींसोबत काम करण्याची संधी त्यातूनच त्यांना मिळाली. संगीत मत्स्यगंधापासून त्यांचे आणि पंडितजींचे सूर जुळले ते शेवटपर्यंत. 'तू तर चाफेकळी' हे नाटक शेवटचं ठरलं. त्यानंतर त्यांनी कधीही मागे वळून बघितले नाही.

आटपाटनगरची राजकन्या, पद्मश्री धोंडीराम, नटसम्राट, सभ्य गृहस्थ, हो माणसाला पंख फुटतात, अखेरचा सवाल, बॅरिस्टर, सूर्याची पिल्ले, दुर्गी, कैकयी, मोरूची मावशी, लग्नाची बेडी, ब्रह्मचारी, तरुण तुर्क म्हातारे अर्क, कलम ३०२, लेकुरे उदंड झाली, ती फुलराणी, प्रियतमा, किरवंत, संध्याछाया, गांधी विरुद्ध गांधी, श्री तशी सौ, नातीगोती, मित्र, जादू तेरी नजर, शोभायात्रा, मी नथुराम गोडसे, श्रीमान योगी, चारचौघी इथपासून ते आजही 'तू म्हणशील तसं, हरविलेल्या पत्त्यांचा बंगला, सारखं काहीतरी होतय, यु मस्ट डाय, नियम व अटी लागू!' ही यादी अपूर्ण आहे. अजूनही पुढे काम सुरूच आहे. शेकडो नव्हे तर हजारो नाटकांना संगीत त्यांनी दिलय. त्यांची पूर्ण यादी प्रसिद्ध करणे म्हणजे एक पुस्तिकच तयार करणे भाग पडेल. ब्लॅक अँड व्हाईट जमान्यापासून ते आजच्या इस्टमन कलरपर्यंतचा त्यांचा वावर! रंगमंचाच्या भाषेत सांगायचं तर रंगविलेल्या पडद्यांपासून ते आजच्या फिरत्या व डबलसेट पर्यंतची त्यांची साथसोबत आहे. तिन पिढ्यांशी त्यांची रंगकर्मींशी दर्दी रसिकांची ओळख आहे. याचा वारंवार अनुभव हा ते समोर असतांना येतच राहातो.

'मोरूची मावशी' हे आचार्य अत्रे यांचे नाटक. हे धम्माल विनोदी नाटक दोनदा रंगभूमीवर आलं. त्यावर 'अत्रे पिक्चर्स' तर्फे चित्रपटही निघाला. पुनरुज्जीवनात १ जानेवारी १९८५ या दिवशी 'सुयोग' तर्फे शुभारंभ झाला. दिलीप कोल्हटकर यांचे दिग्दर्शन आणि संगीत दिग्दर्शन अशोक पत्की! जे तुफान गाजले. त्यातील विजय चव्हाण यांच्या 'टांग टिंग टिंगा'ला चक्क वन्समोअर मिळायचे. 'सुयोग' या नाट्यसंस्थेला या नाटकाने ओळख मिळाली. परदेशातही याचे हाऊसफुल्ल प्रयोग झाले. विनोदाचा पक्का ठेका त्यात होता. 'सुयोग'चे नंतरचे अत्रे यांचेच 'ब्रह्मचारी' नाटकही रंगभूमीवर आले. त्यातलाही वेगळेपणा रसिकांच्या नजरेत भरला. वर्षा उसगांवकर आणि प्रशांत दामले या दोघांनी नाटक गाजविले.

जुनी नाटके नव्या संचात आणि बदललेल्या वातावरणात सादर करतांना संगीतात, गाण्यात जे काही बदल करायचे ते पडद्यामागे त्यांनी केलेले. हे वेगळेपण असल्याने रसिकांचीही चांगली दाद मिळाली. 'सुयोग'चे सुधीर भट आणि गोपाळ अलगेरी यांच्याप्रमाणेच प्रशांत दामले यांच्याशीही चांगले 'स्वरसंबंध' त्यांचे जुळले गेलेत.

प्रशांतने निर्मिती केलेल्या बहुतेक सर्वच नाटकांना संगीतकार, गीतकार म्हणून 'अशोक पत्की' हे नाव झळकते! दोघांचं ट्युनिंग मस्त जुळलेलं. म्हणून आजही 'सारखं काहीतरी होतंय' यातही प्रशांतला गाणं म्हणायला लावलय आणि ताल धरत रसिक नाट्यगृहाबाहेर पडतात. 'माझ्या गाण्याचं शंभर टक्के श्रेय हे संगीतकार अशोक पत्की यांना आहे. त्याच्यामुळेच सारं काही शक्य होतं!' असं प्रशांत वारंवार म्हणतोय.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२५ ऑगस्ट

१) श्रीम. मंदाकिनी प्रदीप पाटील
नागडोंगरी, अलिबाग
२५-८-१९५५

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.


**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते

**स्व. प्रताप दत्तात्रय गंभीर, स्मरणार्थ अलिबाग**

## सुवर्णकण



देह सुख आनंद हा आनंद मानवाप्रमाणे इतर प्राणीही घेतात.
इतकेच नव्हे त्यासाठी सर्व योनीची प्राण्यांची धडपड चालू असते.
देह सुख आनंदाची प्रवृत्ती म्हणजे मानवता नव्हे
निकृष्ट आनंदाची ही पायरी आहे.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय
आबामहाराज परांजपे
साधना आश्रम,
दातार आळी, पेण**

# पालीत खड्डे भरण्याचे काम सुरु

## भाविकांचा प्रवास होणार सुखकर

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

**गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पाली शहरात येणाऱ्या भाविक, नागरिक आणि कोकणात जाणाऱ्या कोकणकरांना रस्त्यावरील खड्ड्यांचा त्रास होऊ नये, तसेच वाहतूक सुरळीत राहावी यासाठी पाली नगरपंचायतीने युद्धपातळीवर खड्डे भरण्याचे व दुरुस्तीचे काम युद्ध पातळीवर सुरू केले आहे. हे काम शनिवार (दि.२३) आगस्टच्या रात्री सुरू करण्यात आले असून, दिवसा शाळा, महाविद्यालय व कार्यालयीन रहदारीच्या वेळेत नागरिकांना अडथळा होऊ नये यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.**



पावसामुळे काही काळ खड्डे दुरुस्तीचे काम थांबले होते. मात्र पावसाने उसंत देताच नगरपंचायतीने पुन्हा काम सुरू करून रविवारी (दि.२४) आगस्टच्या पहाटे साडेतीन वाजेपर्यंत खड्डे भरण्याचे काम अखंडपणे सुरू ठेवले. प्रशासनाने नागरिकांना त्रास होऊ नये म्हणून मेहनत घेतली. मात्र, पुन्हा पुन्हा परतलेल्या पावसामुळे काही ठिकाणी खड्ड्यातील ग्रिट व सामान बाहेर आले आणि त्या ठिकाणी पुन्हा खड्डे पडले, या ठिकाणी पुन्हा दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे.

उपक्रमामुळे पाली शहरातील स्थानिक नागरिकांसह कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना नगरपंचायत हद्दीत प्रवास करताना अधिक सुलभता आणि सुरक्षितता अनुभवता येणार आहे. रस्त्यांची दुरुस्ती झाल्यामुळे वाहतुकीचा वेग सुधारेल, अपघातांचे प्रमाण कमी होईल आणि गणेशोत्सवाच्या काळात भाविकांचा प्रवास अधिक आनंददायी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

पाली नगरपंचायतीच्या या सकारात्मक आणि सेवाभावी पावलामुळे स्थानिक स्तरावर मोठ्या प्रमाणात कौतुक होत असून, शहर गणेशोत्सवाच्या स्वागतासाठी सज्ज होत असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे. प्रशासनाने नागरिकांच्या अपेक्षांची पूर्तता करत एक आदर्श निर्माण केला आहे. जिथे अडथळ्यांवर मात करत सेवा देण्याची भावना सर्वोच्च ठरते.

> **“पालीतील रस्ते वाहतुकीसाठी सुरक्षित राहावेत यासाठी नगरपंचायतीने खड्डे भरण्याचे व दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेतले आहे. भाविक व नागरिकांचा प्रवास सुखकर व्हावा, हा आमचा उद्देश आहे. खड्डे भरताना पावसाचा अडथळा येत आहे, मात्र काम युद्धपातळीवर सुरू आहे. लवकरच रस्ते सुस्थितीत करण्यात येतील.**
>
> **– सुलतान बेनसेकर,
> बांधकाम सभापती,
> पाली नगरपंचायत”**



## प्रा.दिवाकर कदम, नम्रता मुतंगे यांचा सेवापूर्ती समारंभ

**| तळा | प्रतिनिधी |**

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाचे ज्येष्ठ प्रा दिवाकर कदम व गो. म. वेदक विद्यामंदिरच्या शिक्षिका नम्रता मुतंगे यांचा सेवापूर्ती समारंभ उत्साहात पार पडला. याप्रसंगी मारुती शिर्के, चंद्रकांत रोडे, प्राचार्य नानासाहेब यादव, दिलीप ढाकणे, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, माजी विद्यार्थी व स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्रा. कदम व मुतंगे यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. कदम ५ सप्टेंबर २०११ रोजी द ग तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयात रुजू होऊन १४ वर्ष शैक्षणिक सेवा केली. त्यांनी २ विषयात पीएच डी केली असून अन्य क्षेत्रातही पदव्या प्राप्त केल्या आहेत. तर मुतंगे त्यांनी ३९ वर्ष शैक्षणिक सेवा पूर्ण केली.

# ‘कळंब वांगणी एसटी पुन्हा सुरु करा’

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत एसटी आगाराच्या माध्यमातून रस्त्याच्या कारणामुळे बंद असलेली कळंब वांगणी एसटी पुन्हा सुरू करण्याची मागणी आरपीआयने केली आहे. विद्यार्थी आणि नोकरदार यांच्यासाठी सुलभ पर्याय असताना कर्जत एसटी आगाराकडून फायद्यात चालणारी एसटी गाडी बंद केल्याने ती पुन्हा सुरू करण्याची मागणी केली आहे. आरपीआय आठवले गटाने आपल्या निवेदनात रस्त्याचे काम पूर्ण झाले असल्याने एसटी गाडी सुरू करण्यास कोणतेही अडचणी नाहीत आणि त्यामुळे एसटी गाडी सुरू झाली नाही तर जनतेला सोबत घेऊन आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.



कळंब ते वांगणी पाषाणे अशी साळोखमार्गे कळंब चालविली जाणारी एसटी पुन्हा सुरू करण्याची मागणी केली आहे. कळंब येथून वांगणी पाषाणे जाणारी एसटी दोन वर्षापासून बंद होती. एसटी लवकरात लवकर चालू करावी अशी मागणी आरपीआयकडून करण्यात आली. आरपीआय आठवले गटाचे कर्जत तालुका अध्यक्ष मनोज गायकवाड यांनी कर्जत एसटी आगार प्रमुख आणि सहाय्यक वाहतूक नियंत्रक महादेव पालवे यांच्याकडे हे निवेदन देऊन केली.

यावेळी आरपीआय आठवले गटाचे कोकण कार्याध्यक्ष राहुल डाळिंबकर, जयेश शिंदे, ॲड. उत्तम गायकवाड, किशोर गायकवाड, राजू जगताप, अशोक गायकवाड, संतोष जाधव, प्रणव गायकवाड यांनी एसटी आगारात जाऊन ही मागणी केली आहे.

# पारंपारिक पडदा पेंटिंगला मागणी

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

गणेशोत्सव अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे मखर सजावटीची सर्वत्र लगबग सुरू आहे. उरण तालुक्यातील जोशी आर्टचे संचालक सुभाष जोशी यांनी रंगसंगतीतून विविध प्रकारच्या पडदा पेंटिंगच्या माध्यमातून आकर्षक मखरे आपल्या कुंचल्यातून रेखाटली आहेत. या पडदा पेंटिंगच्या मखरांना गणेशोत्सवात मोठी मागणी असल्याचे जोशी यांनी सांगितले. एकेकाळी कागदाची कटिंग करून बांबूच्या चिपांचा वापर करत, तसेच पडदा पेंटिंग करून, मखरे तयार केली जात होती. त्यानंतर थर्माकॉलचे मखर बनविण्यास सुरुवात झाली.



आकर्षक स्वस्त आणि वजनाला हलक्या असणाऱ्या थर्माकॉलच्या मखरांच्या मागणीत वाढ झाली होती. मात्र थर्माकॉलचे विघटन होत नसल्याने गणपती उत्सव संपल्यानंतर टाकण्यात येणाऱ्या थर्माकॉलच्या कचऱ्याचा परिणाम पर्यावरणावर होऊ लागला. आणि संपूर्ण पर्यावरण धोक्यात आले. त्यामुळे शासनाने थर्माकॉलच्या मखरांवर बंदी आणली आहे. गौरी गणपतीचा सण म्हटला की आनंदोत्सव व कलाकुसर यांचे प्रदर्शन करणारा सण. त्यात गौरी गणपतीचा सण मराठी कोकणी माणसांच्या हृदयापासून साजरा करण्यात येणारा हा सण. गणेशोत्सवात गणेशमूर्तीची स्थापना करण्यासाठी मखर सजावट ही महत्त्वाची असते.

## विद्यार्थी गिरवणार इ-लर्निंगचे धडे

**| रोहा | प्रतिनिधी |**

डिंगणवाडी जिल्हा परिषद शाळेत आजपासून विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शिक्षणाची नवी दारे उघडली गेली आहेत. मातोश्री सिताबाई रामचंद्र म्हात्रे यांच्या स्मरणार्थ भानुदास रामचंद्र म्हात्रे यांनी शाळेला टीव्ही भेट दिला असून यामुळे शाळेत इ-लर्निंगच्या माध्यमातून अध्यापन सुरू होणार आहे. त्यामुळे डिंगणवाडी शाळा आता डिजिटल शिक्षणाच्या प्रवाहात सामील झाली असून गावातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानासह दर्जेदार शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या उपक्रमाचे उद्घाटन भानुदास म्हात्रे यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी अतिश मोरे, अभिजित भोईर, दिपक पाबरेकर, गणेश आंब्रे, नितीन शेडगे, रुपेश गोयने, ऋतुजा आंब्रे तसेच महिला वर्ग व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तंटामुक्त अध्यक्षपदी मुसळे

**| कोलाड | प्रतिनिधी |**

रोहे तालुक्यातील चिंचवलीतर्फे आतोने ग्रुप ग्रा.पंचायतीच्या तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्षपदी लक्ष्मन मुसळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुसळे यांची तंटामुक्त अध्यक्ष पदी निवड होताच रवींद्र तारू यांच्या सह बल्हे गावातील युवक वर्ग, ग्रामस्थांनी त्याना शुभेच्छा दिल्या आहेत.

## जागतिक डास दिनानिमित्त जनजागृती



**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुडच्या अंजुमन इस्लाम जंजिरा डिग्री कॉलेज ऑफ सायन्स, मुरूड येथील प्राणिशास्त्र विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक डास दिननिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. साजिद शेख यांच्या मार्गदर्शनाखाली डासांमुळे उद्भवणाऱ्या आजारांवर जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात मुरुड शहरातील नगरपरिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना डासांपासून होणाऱ्या आजारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मलेरिया, डेंग्यू, चिकनगुनिया, फिलेरिया अशा डासांमुळे होणाऱ्या आजारांची माहिती देऊन स्वच्छता व प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे महत्त्व पटवून सांगण्यात आले. या उपक्रमामध्ये अंजुमन विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सादरीकरण, माहितीपत्रक वितरण व प्रत्यक्ष संवादातून विद्यार्थ्यांना जागरूक केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राणिशास्त्र विभागप्रमुख प्रा. जावेद खान, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. फिरोज शेख, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागप्रमुख प्रा. रहीम बागवान तसेच विद्यार्थ्यांमध्ये जारा खानजादा, जुवेरिया कलबस्कर, फातिमा जमरुतखाणी आणि आमीना किल्लेदार उपस्थित होते. या विशेष मोहिमेबद्दल पालक व स्थानिक समाजाकडून समाधान व्यक्त करण्यात आले असून, स्वच्छ व निरोगी परिसर राखण्यासाठी विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नाचे कौतुक होत आहे.

# पॅनोरमा पॉईंटची स्वयंसेवकांकडून स्वच्छता

**| माथेरान | प्रतिनिधी |**

माथेरानचे वैभव म्हणून गणला जाणारा सूर्योदयासाठी सुप्रसिद्ध अशा पॅनोरमा पॉईंटची स्वच्छता माथेरानमधील काही समाजसेवकांनी केली असून या ठिकाणी बेजबाबदार पर्यटकांकडून टाकलेल्या घाणीतून हा संपूर्ण परिसर स्वच्छ करून एक नवीन पायंडा घातला आहे.



माथेरानमधील होतकरू सर्व सहकारी माथेरानमधील विविध पर्यटन स्थळावरील कचरा अशा प्रकारे अनेक वर्षापासून स्वच्छ करत आहेत. आपला व्यवसाय सांभाळून ही समाजसेवक मंडळी नेहमीप्रमाणे हे काम करत असतात. माथेरानमधील पॅनोरमा पॉईंट हा येथील पर्यटकांच्या आकर्षणाचे मुख्य केंद्र आहे याचप्रमाणे घोडेस्वार येथे घोडेस्वारीचा आनंद घेण्याकरिता येत असतात या पॉईंटचे मुख्य आकर्षण म्हणजे येथून दिसणारा सूर्योदयाचा नयन रम्य देखावा, ३६० व्ह्यू अशीही या ठिकाणाची ओळख आहे. माथेरानमध्ये सर्वात उंच असा हा पॉईंट असल्याने येथे पर्यटक नेहमीच भेट देत असतात परंतु मागील काही दिवसांपासून या पॉईंटला घरघर लागली आहे, या ठिकाणी ब्रिटिश कालीन बारमुख पार्क हे उद्यान होते. मागील दोन वर्षांमध्ये या ठिकाणी सुशोभीकरणाचे काम करण्यात आले त्यावेळी येथील सुस्थितीत असलेला कारंजा तोडून नवीन बनवण्याचे काम हाती घेण्यात आले होते. परंतु येथील कारंजा वर असलेले आकर्षक मूर्ती काही काळ चोरीला गेली होती व या गोष्टीचा गाजावाजा झाल्यानंतर ही मूर्ती आपोआप सापडली होती. परंतु यावेळी ती तोडून आणली गेली जी आजतागायत या ठिकाणाहून गायब आहे, ज्या कडे पालिकेने दुर्लक्ष केल्याचेच दिसून येत आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रिकाम्या पाण्याच्या बाटल्या, खाद्य पदार्थांचे रिकामी पाकिटे, पावसापासून बचाव होण्याकरता येथे वापरले जाणारे प्लास्टिकचे रेनकोट सर्वत्र विखुरलेले होते ज्यामुळे या परिसराला डम्पिंगचे स्वरूप प्राप्त झाले होते त्यामुळेच येथील युवकांनी पुढाकार घेत येथील सर्व कचरा जमा करताना कड्या लगत असलेला कचराही जोरदार पाऊस असताना उचलण्यात आला.

## माथेरानमध्ये पूजा साहित्य वाटप

**| माथेरान | प्रतिनिधी |**

भाद्रपद महिन्याला सुरुवात होताच गणपती आगमनाच्या तयारीला अधिक जोर येत असतो माथेरानमध्ये ही पावसाळी पर्यटन हंगाम नुकताच संपला असल्याने येथील नागरिकांना आता वेध लागले आहेत.

घरगुती गणेशोत्सव साजरा करणाऱ्यांकरिता विविध पूजा साहित्य व इतर वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. तर प्रसादासाठी लागणाऱ्या सुकामेव्याचे वाटप चंद्रकांत चौधरी यांच्या मार्फत करण्यात येणार आहे.

त्याचप्रमाणे पूजेसाठी लागणारे श्रीफळ प्रमोद नायक व नरेश परदेशी यांच्याकडून देण्यात येणार आहे. यावेळी कोणताही गाजावाजा न करता हे पूजेचे साहित्य वाटप करण्यात येणार असल्याने त्याचा लाभ माथेरानमधील गणेश भक्तांना होणार आहे. तसेच गोर-गरिबांना याचा फायदा होणार आहे.

## व्हॉटसअप ग्रुपला १० वर्षे पूर्ण

**पनवेल :** नवीन पनवेल रहिवासी संघळ च्या व्हॉट्स ॲप ग्रुपला दहा वर्षे पूर्ण झाल्याकारणाने सदर संघातील सदस्य यांनी आज सी के टी स्कूल नवीन पनवेल येथे एकत्र जमून सदर संघास समाजाचे विविध समस्यांचे निराकरण करण्यात आले. तसेच सभासदाना एकत्र काम करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी ॲड. मनोज भुजबळ, सचिन देसाई, ठाकरे व नवीन पनवेलमधील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शंकर ठाकूर यांची तंटामुक्त अध्यक्षपदी निवड

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

वांगणी येथील सामाजिक कार्यकर्ते शंकर ठाकुर यांची वांगणी ग्रामपंचायतीच्या महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीच्या अध्यक्षपदी दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली आहे. याबद्दल वांगणी ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी लहू तेलंगे, एकनाथ दळवी, लिलाधर भिसे, वसंत भिसे, तुकाराम (बाळा) भिसे, नरेश दळवी यशवंत यादव, विश्वनाथ शिर्के, राकेश भिसे, जगन दळवी, मोहन मांडे, सचिन तेलंगे, दिपक यादव, चंद्रकांत शिर्के, यशवंत (बाळा) भिसे, चंद्रकांत हि. दळवी, नारायण भिसे आदी ग्रामस्थ होते उपस्थित होते.

### महामार्गावरील दुर्घटना टाळण्यासाठी उपक्रम | राष्ट्रीय सेवा योजनेचे सहकार्य

# कोलाड महाविद्यालयात वाहतूक सप्ताह

**| कोलाड | प्रतिनिधी |**

**कोलाड येथील तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवे-कोलाडचे संस्थेचे संदीप तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत गणेशोत्सव विशेष वाहतूक सप्ताहाचे आयोजन शनिवार दि. २३ ऑगस्ट ते मंगळवार दि. २६ ऑगस्टपर्यंत मुंबई गोवा महामार्गावरील वाहतूक नियंत्रण व राष्ट्रीय दुर्घटना टाळण्यासाठी कोलाड या ठिकाणी विशेष सप्ताहाचे आयोजन करण्यात आले.**



या गणेशोत्सव विशेष वाहतूक सप्ताहाचे उद्घाटन प्रसंगी कोलाड पोलीस स्टेशनचे सपोनि नितीन मोहिते, अजित तेलंगे, प्राचार्य डॉ.विश्वास देशमुख, उपप्राचार्य नेहल प्रधान, प्रा. मोरे अनिरुद्ध, प्रा. जानवी म्हसकर, डॉ. सतीश सावळे, प्रा. रेश्मा शेळके, डॉ. अमलपुरे सूर्यकांत, प्रा. दर्शना माळी, रिया कोदे, प्रा. गितु मोहन, प्रा. कीर्ती राधाकृष्णन तसेच प्राध्यापक तसेच कार्यलयीन कर्मचारी उपस्थित होते.

समारोपाप्रसंगी प्राचार्य डॉ. विश्वास देशमुख यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व मान्यवरांचे आभार मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समृद्धी आहिरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक व कार्यालयीन कर्मचारी तसेच मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक उपस्थित राहून सहकार्य केले.

> “राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वंयसेवकांचे सहकार्य आम्हाला वेळोवेळी मिळत आहे. येथे चार दिवसांमध्ये हे सर्व स्वंयसेवक महामार्ग वाहतुकीसाठी आम्हाला मदत करणार आहेत.
>
> – नितीन मोहिते
> सपोनि”




# जिल्हा उद्योग केंद्रात वृक्षारोपण

**| पनवेल | प्रतिनिधी |**

जिल्हा उद्योग केंद्र रायगड - अलिबाग व पनवेल इंडस्ट्रीयल को-ऑप इस्टेट लिमिटेड पनवेल यांच्यावतीने रविवार (दि.२४) वृक्षारोपण रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रांत अधिकारी पवन चांडक, तहसीलदार विजय पाटील, पनवेल महापालिकेचे उपयुक्त वैभव विधाते, पनवेल इंडस्ट्रीयल को-ऑप इस्टेट लिमिटेडचे चेअरमन विजय लोखंडे, उपाध्यक्ष सुवर्णा पुराणिक, संचालक विजय देशमुख, सुनील सुचक, दीप लोखंडे, श्रीजय सुरतकल, ममता त्यागी, व्यवस्थापक दत्तकुमार सावंत, सदस्य स्वर्णपाल सिंग कोहली, फतेहलाल जैन, अभिषेक धोंड, कृतार्थ पटेल, मंदार पोदार, आदेश कोठारी, कल्पना लोखंडे, सिद्धी लोखंडे उपस्थित होते.

यावेळी जिल्हा धिकारी किशन जावळे यांनी या उपक्रमाचे कौतुक करून वृक्ष रोपणाबरोबरच त्यांचे संवर्धन ही करा असा संदेश दिला.

त्यानंतर त्यांनी पनवेल इंडस्ट्रीयल को ऑप इस्टेट लिमिटेडचे चेअरमन विजय लोखंडे यांच्या कारखान्याची पाहणी केली.

## निवडक



### बाप्पासाठी अलंकारांचा बाजार

**उरण :** गणेशोत्सवाच्या धर्तीवर उरणात चांदी आणि सोनेरी अलंकारांचा बाजार सुरु झाला आहे. नाजूक दुर्वा, मिनावर्क केलेली जास्वंदाची फुले, रेखीव मोदक, रत्नजडित मुकुट, कोरीव काम केलेले हार आणि अनेक प्रकारच्या दागिन्यांनी गणपतीसाठी सजावटीला खास रंग भरला आहे. भक्तांच्या आवडीनुसार सर्वसामान्यांच्या आवाक्यातील दागिने बाजारात उपलब्ध असून ग्राहकांचा प्रतिसाद उत्साही आहे. गणपतीसाठी सजावट करताना लहान वस्तूपासून ते राजवटीच्या मुकुटांपर्यंत प्रत्येक वस्तू खूप विचारपूर्वक निवडली जाते. गेल्या ५-६ वर्षांपासून ही परंपरा दृढ होत असून, दरवर्षी नवे, आकर्षक अलंकार बाजारात येतात. चोखंदळ ग्राहकांसाठी कारागीरांनी अवघ्या ५ ग्रॅम पासून विविध प्रकारची चांदीची दागिने तयार केली आहेत. त्याचे दर सर्वसामान्यांना परवडणारे असून, शंभर रुपयांपासून ते हजारों रुपयांपर्यंत दागिने उपलब्ध आहेत. यामुळे बाजारात खरेदीला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. यंदा चांदीसह सोन्याचे दागिने घेण्याचा कल वाढलेला दिसतो आहे. गणेश अलंकार, पूजा साहित्य, फळे व फुलांसह तयार केलेले सेट भेट म्हणूनही खरेदी होत आहेत. भक्तांचा उत्साह आणि कारागीरांचा नवकल्पनाशील प्रयत्न यामुळे गणेशोत्सवाची शोभा या वर्षी दुगुनी झाली आहे.




### वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर

**मुरूड, जंजिरा :** डॉ. सनाउल्लाह घरटकर यांच्या ७१ व्या वाढदिवसानिमित्त व संजीवनी आरोग्य सेवा संस्थेच्या ८ व्या वर्धापन दिनानिमित्त संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबीर तसेच महात्मा गांधी मिशनचे दंत महाविद्यालय आणि रुग्णालय सेक्टर १८, कामोठे, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने क्लेष्ट आणि कॅनियोफेशियल तपासणी शिबिराचे आयोजन श्रीमती अंजनाबाई पुंडलिकराव लहाने हेल्थ एण्ड केअर सेंटर दत्तमंदिर येथे करण्यात आले होते. यावेळी ७१ रक्त पिशव्या संकलित करण्यात आले. तसेच महात्मा गांधी मिशनचे दंत महाविद्यालय व किरण ठाकूर यांच्या सहकार्याने ० रूग्णांची जन्मजात फाटलेले ओठ व टाळू, चेह-यावरील जन्मजात खूण, कान व चेहऱ्यावरील गाठ इत्यादिंची या शिबिरात तपासणी करण्यात आली असून उपरोक्त रुग्णालयामार्फत मोफत शत्रक्रिया करुन दिल्या जाणार आहेत. या शिबिराचे आयोजन राशिद फहीम, विजय सुर्वे, डॉ. मकबूल कोकाटे, वासंती उमरोटकर, नगमाना खानजादा, जयश्री प्रधान, आदेश दांडेकर, शकील कडू, जहूर कादरी, कीर्ती शहा व संजीवनी सेंटरचे सर्व सहकारी कर्मचारी वर्ग यानी अथक परिश्रम घेतले.




### खरेदीसाठी बाजारपेठा गजबजल्या

**चिरनेर :** गणपती बाप्पाचे आगमन अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपले असून, उरण, पनवेलच्या बाजारपेठासह ग्रामीण भागातील बाजारपेठाही सजल्या आहेत. यात गणरायाच्या पूजेच्या साहित्याबरोबर व सजावटीच्या वस्तूंनी बाजारपेठा सजल्या आहेत. यामध्ये सुगंधित अगरबत्ती, अनेक प्रकारचे धूप, कापूर, अनेक प्रकारच्या आकर्षक कंठ्या, तूपवाती, कापूसवाती, अलंकार कंठी, अनेक फुलांचे हार, गणपती बाप्पा मोरयाची पट्टी, अत्तर, बाप्पासाठी वस्त्र, मोती कंठी अशा अनेक वस्तूंनी बाजारपेठा बहरल्या आहेत. घरातील बाप्पा सर्वात वेगळा दिसावा यासाठी गणेशभक्त सजावटीसाठी लागणाऱ्या साहित्याची खरेदी करत आहेत. यामध्ये सुगंधी अगरबत्तीला तसेच कंठी, हारफुलांना मोठी मागणी असल्याचे विक्रेत्या सुलोचना पाटील यांनी सांगितले. गणपती बाप्पांचा उत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी गणेश भक्तांनी घरेदारेही सजविली आहेत. त्यामुळे उरण-पनवेलच्या बाजारपेठांमध्ये गणेशोत्सवाचे साहित्य खरेदी करण्यासाठी लोकांची गर्दी उसळली आहे. घरगुती आणि सार्वजनिक मंडळांच्या माध्यमातून बाप्पांच्या मखराची आरास करण्यासाठी विविध प्रकारची सजावटीची फुले, विजेची तोरणे आदींचा वापर केला जात आहे. दगडूशेठ हलवाई, श्रीकृष्ण अवतारतील गणपती बाप्पा बरोबरच लालबागचा राजा, कोच वाला, फेटेवाला अशा प्रकारच्या गणरायाच्या मूर्तींना भक्तांची मोठी मागणी आहे. विशेषता: शाडूमाती पासून तयार करण्यात आलेल्या गणेश मूर्तींना मोठ्या प्रमाणावर मागणी असल्याचे मूर्तिकारांनी सांगितले. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा इकोफ्रेंडली मूर्तीची मागणी २० टक्यांनी वाढली आहे.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **मालाडे, अलिबाग-रोहा या रस्त्यालगत** (१५ एकर) ६०० गुंठे शेत जमीन रुपये तीन लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १२४ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२
- **श्रीगाव, अलिबाग येथे शेत जमीन** २३० गुंठे, रुपये ४ लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक २७७ लगत) सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२
- **वसोली, अलिबाग येथे शहरालगत** १०० गुंठे शेत जमीन रुपये २० लाख गुंठा या दराने विकणे आहे. (गट क्रमांक १७३ लगत)सचिन : ९८२२२५७९२९, ९३५९५२८७२२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# जलशुद्धीकरण केंद्रात गढूळ पाणी

## दोन-तीन महिने कमी दाबाने पुरवठा; नवीन योजनेचा उडाला बोजवारा

| नेरळ | प्रतिनिधी |

**मुंबईचे उपनगर म्हणून विकसित होत असलेल्या नेरळ गावामध्ये वाढणारी लोकसंख्या यांना नागरी सुविधा देण्यात नेरळ ग्रामपंचायत कमी पडत आहे. गावातील रहिवाशांना पिण्याचे पाणी वेळेवर मिळत नाही त्याचवेळी मिळणारे पाणी हे अशुद्ध आणि गढूळ मिळत आहे. त्यामुळे जलशुद्धीकरण केंद्र असलेल्या नेरळ पाणी योजनेमधून शुद्ध पाणी देण्यास नेरळ ग्रामपंचायत असमर्थ ठरत असल्याचे दिसून येत आहे. गढूळ पाणी येण्याची कारणे आणि कमी दाबाने पाणी येण्याची कारणे ग्रामपंचायतीने द्यायला हवीत अशी मागणी सर्वसामान्य नेरळकर करीत आहेत.**



नेरळ गावासाठी १९९८ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून साडेसात कोटींची नळपाणी योजना केली. त्यानंतर २०२१ पर्यंत या नळपाणी योजनेची मुदत होती, परंतु आता २०२५ साल संपायची वेळ आली तरी नवीन नळपाणी योजना नेरळ गावासाठी मंजूर झालेली नाही. त्याच्यामुळे नेरळ गावातील अनेक भागात आज कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. त्यामुळे नेरळ ग्रामपंचायतीसाठी आलेल्या नवीन नळपाणी योजना नेरळ ग्रामपंचायतीसाठी मंजूर होणे आवशयक असताना आजपर्यंत झालेली नाही. दुसरीकडे जुनी झालेली नळपाणी योजना आज बाद झालेली दिसून येत आहे. तरी देखील नवीन नळपाणी योजना तयार करण्यासाठी नेरळ ग्रामपंचायत आग्रही नसल्याचे दिसून येत आहे. त्याचा परिणाम नेरळकरांना गेली काही महिने गढूळ पाणी प्यावे लागत आहे. त्यामुळे नेरळकर साथीच्या आजाराने त्रस्त झाल्याचे दिसून येत आहेत. नवीन नळपाणी योजनेचा बोजवारा उडाला असून या योजनेच्या कामावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अंकुश नसल्याने तीन वर्षानंतर देखील नळपाणी योजनेचे काही खरे दिसत नाही.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीला पाणीपुरवठा करणारा जलशुद्धीकरण प्रकल्प बंद असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत. त्या जलशुद्धीकरण केंद्राचे फिल्टर प्लांट पावसाळ्यापासून बंद असल्याचे बोलले जात आहे. पाणी शुद्ध करणारे पंखे बंद असून ग्रामपंचायत पाणीपुरवठा विभाग केवळ आलम टीसीएल हे पाणी शुद्ध करण्यासाठी टाकत असतात. त्यामुळे पाणी शुद्ध करणारी यंत्रणा बंद पडल्याने उल्हास नदीमधून उचललेले गढूळ पाणी थेट घरोघरी नळाद्वारे पोहचत आहे. त्यामुळे नेरळ नळपाणी योजनेचे पाणी गढूळ पाण्याने हाल केले आहेत.

सध्या पावसाळा आहे, आणि अशा पावसाळ्यात यापूर्वी अनेक वर्षे स्वच्छ येत होते. मात्र आताच काय अशुद्ध आणि गढूळ पाणी येते याचे उत्तर नेरळ ग्रामपंचायतीकडे नाही. त्याचवेळी गेली दोन तीन महिने सातत्याने कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने स्थानिक रहिवाशी साधे पाणी देऊ शकत नाही असे आरोप जनता ग्रामपंचायतीवर करीत आहेत.

> सध्या पावसाचा जोर जास्त असल्याने उल्हासनदीचे पाणी देखील गढूळ झाले आहे.त्यामुळे काही प्रमाणात गढूळ पाणी येत आहे.तर पंप हाऊस परिसरात मोठ्या प्रमाणात उल्हासनदीचे पाणी भरले होते आणि त्यामुळे मागील दोन दिवस पाणी पुरवठ्यात अडचणी यात होत्या.
> – अरुण कार्ले
> ग्रामपंचायत अधिकारी

## शिक्षकांच्या पाककला स्पर्धा

| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |

रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि.अलिबाग ही संस्था १४ सप्टेंबर २०२५ रोजी १०० वर्ष पूर्ण करीत आहे. या संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्ताने, सभासदांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी संस्थेचे मानद सचिव तथा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक देवानंद गोगर यांच्या संकल्पनेतून मुरूड तालुका मर्यादित शिक्षकांच्या पाककला व रांगोळी स्पर्धाचे मुरूड नगरपालिका शाळा क्र.१ येथे आयोजित करण्यात आले होते.स्पर्धेचे उदघाटन संजय गुंजाळ व गटशिक्षणाधिकारी सुनिल गवळी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या दोन्ही स्पर्धेत तालुक्यातील अनेक शिक्षकांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. यावेळी दिनेश म्हात्रे, जितेंद्र मकू, सुनिल पाटील, राजेश भोईर, पांडुरंग आरेकर परीक्षक महेंद्र पाटील, जठारी, प्रिती चौलकर हे उपस्थित आहेत. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रेश्मा धुमाळ, देवानंद गोगर, राजेश भोईर, सुनिल पवार, भास्कर साळावकर, जगदिश चवरकर, गणेश गोयजी, हेमकांत गोयजी, संध्या नागे, मयूर चौलकर आदी शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले.



गणेशमूर्ती सजावटीतून महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. गणेशमूर्तीला विविध प्रकारचे मोती, हिरे लावण्यात अलिबाग-नेहूली येथील सायली कला केंद्रात महिला व्यस्त आहेत. (छाया : समीर मालोदे)

## डॉ. धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे स्वच्छतेचा संदेश

| रेवदंडा | प्रतिनिधी |

पावसाळ्यातील कचरा हटवून 'स्वच्छ गाव - सुंदर गाव' मोहिमेत ५५.८५ टन कचऱ्याचे संकलन डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या १३३५ सदस्यांचा साळाव ते अलिबाग परिसरात सहभाग पावसाळ्यात रस्त्याच्या दुतर्फा वाढणारी झाडे, झुडपे, प्लास्टिक, कचऱ्याचे ढीग आणि पावसाच्या पाण्यामुळे साचणारी घाण यामुळे रस्ते अपघातप्रवण होतात, तसेच परिसरात अस्वच्छतेचे



या उपक्रमात प्रतिष्ठानचे तब्बल १३३५ स्वयंसेवक कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला.

रस्त्यालगत वाढलेली झाडे व झुडपे छाटण्यात आली. नाल्यांत एकूण ५५.८५ टन कचरा संकलित करून योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली.

या अभियानामुळे रस्त्याचे सौंदर्य तर खुललेच, परंतु

> **स्वच्छतेचा संदेश**
> स्वच्छतेच्या या भव्य मोहिमेतून प्रतिष्ठानने पुन्हा एकदा समाजासमोर स्वच्छ गाव, सुंदर गाव हा संदेश अधोरेखित केला. नागरिकांनीही आपल्या आजूबाजूला कचरा टाकू नये, प्लास्टिकचा वापर टाळावा व पर्यावरण रक्षणासाठी पुढे यावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

स्वच्छतेमुळे डेंग्यू, मलेरिया, पाण्यातील रोगांचा धोका कमी होईल, सुरक्षित व स्वच्छ वातावरण नागरिकांना लाभेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## विद्यार्थ्यांनी मांडला भविष्याचा लेखाजोखा

| रोहा | प्रतिनिधी |

रोहे शहरातील ज्ञानगंगा बहुविकलांग संस्था व रिसबूड परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आंतर शालेय निबंध स्पर्धे चे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत इयत्ता आठवी ते दहावी गटासाठी ङ्ग३५ वर्षाच्या वयामध्ये मी स्वतः ला काय खाऊ घालेन?फ या विषयावर स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत तालुक्यातील १४ शाळांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला.

सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या देशाच्या भावी पिढीने कागदावर आपल्याच भविष्याचा लेखाजोका मांडल्याने आयोजक व पाहुणे अंचबीत झाले. या स्पर्धेत तनिष्का आपणकर हीने प्रथम क्रमांक पटकविला असून ऋतिका सावंत ही द्वितीय तर एंजल फर्नांडिस हीने तृतीय क्रमांक पटकावला आहे. तर, उत्तेजनार्थ म्हणून मृण्यमयी दळवी, संद्या मेहता, दिव्या किर, अक्षरा ठाकूर यांना देखील कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. राहुल मराठे व अन्य प्रमुख मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या स्पर्धेत निबंधांचे परीक्षण म्हणून माधव दाते व मळेकर यांनी काम पाहिले.

## गणेशोत्सवासाठी पनवेलमध्ये १९५ एसटी बस सज्ज

**पनवेल :** गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या सोयीसाठी राज्य परिवहन महामंडळाने विशेष तयारी केली आहे. याचाच भाग म्हणून लातूर विभागाच्या १९५ एसटी बसगाड्या पनवेलमध्ये दाखल झाल्या आहेत.

बसगाड्यांची संख्या मोठी असल्यामुळे लातूर विभागातून आलेल्या या संभाव्य वाहतूक कोंडी टाळण्यासाठी प्रशासनाने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाशेजारील उलवे-करंजाडे रस्त्यावर त्या थांबवण्याची व्यवस्था केली आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात या उभ्या करून ठेवण्यात आल्या असून आगारप्रमुख ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या बसगाड्या आजपासून ग्रुप बुकिंग केलेल्या प्रवाशांना घेऊन कोकणच्या दिशेने निघाल्या असल्याचे सांगितले आहे.

## डॉ. धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे स्वच्छता अभियान

| रोहा | प्रतिनिधी |

डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्यावतीने रोहे शहरात रविवार (दि.२४ ) रोजी रोहे नगर परिषद हद्दीतील संपूर्ण शहरातील मुख्य व अंतर्गत तसेच शहराला जोडणारे सर्व रस्त्यांची तसेच बस स्थानक परिसर व अन्य चौकातील स्वच्छता करण्यात आली.

स्वच्छता अभियानामध्ये ४०३ श्री सदस्य,२० शासकीय अधिकारी व कर्मचारी व इतर व्यक्तींनी सहभाग नोंदविला.




एकंदरीत या स्वच्छता अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्वच्छता अभियान उपक्रमाला मयूर दिवेकर, मनोज पुळेकर, सुधीर भगत, श्रीनिवास पाटील बिलाल मोरबेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रतिष्ठानतर्फे आता पर्यंत राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानामध्ये वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन, वृक्ष संगोपन तसेच गणपती विसर्जनाच्या काळात निर्माल्य गोळा करणे या बद्दल माहिती देत माजी उपनगराध्यक्ष मयूर दिवेकर यांनी प्रतिष्ठानचे कौतुक केले.

या अभियाना अंतर्गत एकूण २६ टन कचरा गोळा करुन डंपिंग ग्राउंडमध्ये नेण्यात आला. या स्वच्छता अभियान कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून चांगल्या प्रकारचे सहकार्य केले.

**जून महिना सुरू होण्याआधीच बुकींग पूर्ण** | **कारखान्याला ७५ वर्षाची परंपरा**

## नेरळच्या कुंभारवाड्यात फक्त शाडूच्या मूर्ती

| नेरळ | प्रतिनिधी |

**प्रामुख्याने ठाणे जिल्ह्यातील गणेश भक्तात नेरळ येथील गणेश मूर्ती बनविणारा कारखाना प्रसिद्ध आहे. फोटो कॉपी प्रमाणे गणेश मूर्ती बनविला जाणारा कारखाना अशी ओळख असलेल्या कारखान्यात केवळ शाडूच्या मूर्ती बनविल्या जातात. दरम्यान, नामशेष होत असलेल्या पपर्यावरण पूरक शाडू मातीपासून बनविलेल्या गणेशमूर्ती यांना विशेष मागणी असते. त्यात आता शाडूच्या मूर्ती बनवणे आर्थिक दृष्ट्या महाग झाले आणि त्यामुळे कारखाने देखील लोप पावले आहेत. दुसरीकडे रंगसंगतीसाठी प्रसिद्ध असलेल्या नेरळमधील कुंभारवाड्यातील गणेशमूर्ती या कायम पसंतीच्या ठरल्या आहेत.**

नेरळ या मध्य रेल्वेच्या जंक्शन रेल्वे स्थानकाची आणखी एक ओळख आहे ती म्हणजे शाडूच्या मातीपासून बनविलेल्या गणेशमूर्ती यांची. नेरळ येथील गणेशमूर्ती बनविण्याचे कारखान्याला ७५ वर्षाची परंपरा आहे. महागाई आली तरी भक्तांचे प्रेम कमी झालेले नाही हे नेरळ कुंभारवाड्यामध्ये असलेल्या कारखान्यात होणारी गर्दी बघितली की लक्षात येते. शाडूच्या मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याचा कारखाना हा कर्जत, पनवेल या भागातील गणेशभक्तांना जवळचा वाटतो, तसा तो ठाणे जिल्ह्यातील गणेशभक्तांना देखील आपला वाटतो. नेरळमधील कुंभारआळी आणि तेथील कुंभारवाडा हा खास बाप्पाच्या मूर्ती बनविण्यासाठी प्रसिद्ध आहे. ७५ वर्षे दहिवलीकर यांच्या कारखान्यात केवळ शाडूच्या मातीपासून बनविल्या जाणाऱ्या गणेशमूर्ती या घडविल्या जातात. कुंभार आडनावाचे दहिवलीकर झाले पण त्यांची या महागाईच्या जमान्यात शाडूच्या मातीपासून बनविल्या जाणाऱ्या मूर्ती यांची आवड काही कमी झाली नाही. तालुक्यात शाडूच्या मातीचे म्हणजे पर्यावरण पूरक मातीपासून बनविले जाणाऱ्या गणेशमूर्तीचे निवडक कारखाने आहेत. त्यात नेरळ येथील दहिवलीकरांचा पूर्वीचा श्री गणेश



कलाकेंद्र आणि आताचे सिद्धेश गणेश कला केंद्र हा कारखाना आघाडीवर आहे.

आज दहिवलीकर यांची तिसरी पिढी शाडूच्या मातीपासून मूर्ती घडवत आहेत. त्यात महिला देखील आघाडीवर असून प्रामुख्याने रंगकाम करण्याचे काम महिला करीत असतात. वामन कुंभार यांनी ७५ वर्षापूर्वी शाडूच्या मूर्ती बनविण्याचा कारखाना सुरू केला, त्यावेळी त्यांच्यासोबत नारायण दहिवलीकर आणि हरिभाऊ दहिवलीकर हे शाडूच्या मातीपासून बनविलेल्या मूर्ती बनवायचे. आता काळाच्या ओघात कामे वेळेत उरकत नसल्याने शाडूच्या मातीपासून बनविल्या जाणाऱ्या मूर्ती या कमी होऊ लागल्या आहेत. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती स्वस्त आणि पाण्यात विरघळत नसताना देखील परवडतात म्हणून त्यांना अधिक मागणी आहे. मात्र महागाई असली तरी सिद्धेश कला केंद्रामध्ये गणेश भक्तांची एप्रिल महिन्यापासून ये जा सुरू होते. त्याचे कारण म्हणजे फोटो प्रमाणे गणेश मूर्ती बनवून दिल्या जात असल्याने नेरळ येथील गणेश मूर्ती ठाणे-मुंबईत प्रसिद्ध आहेत.अगदी हुबेहूब गणेश मूर्ती नेरळमध्ये बनवून मिळत असल्याने नेरळचे मिलिंद दहिवलीकर आणि प्रमोद दहिवलीकर हे प्रसिद्ध आहेत.

शाडूच्या मूर्ती घडवून कमी नफा मिळत असला तरी दहिवलीकर कुटुंबे ही आनंदी आहेत. शाडूच्या मातीच्या मूर्ती या पेणच्या प्रसिद्ध गणेश मूर्तीच्या तोडीच्या असल्याने गुजरात वरून दरवर्षी अधिक किंमत मोजून माती आणून देखील ही कुटुंबे आनंदी आहेत. एक फुटपासून पाच फुटापर्यंत उंचीच्या गणेशमूर्ती घडविण्याचे काम होत असून त्या ठिकाणी मिळणाऱ्या पर्यावरण पूरक गणेशमूर्ती या जून महिना सुरू होण्याआधी पूर्णपणे बुक होतात हे प्रेम देखील दहिवलीकर कुटुंब यांना त्यांच्या आकर्षक रंगसंगती यामुळे मिळाले आहे. सिद्धेश कला केंद्रामध्ये आता शाडूच्या मातीपासून बनविलेल्या गणेश मूर्तीवर अखेरचा हात फिरवला जात आहे. गणेश उत्सव ऐन काही दिवसांवर येऊन ठेपल्याने तेथे सर्वांची लगबग सुरू आहे.

> आमच्या आजोबांनी सुरू केलेली परंपरा आम्ही काय नफा मिळतो हे न पाहता कायम ठेवली आहे.सध्याच्या धकाधकीच्या जीवनात आणि महागाई प्रचंड वाढली असताना देखील आम्ही ७५ वर्षांपूर्वी ज्या प्रमाणे मूर्ती घडवायचो,अगदी त्याच प्रेमाने मूर्ती घडवित आहोत.त्यात आम्हाला येणाऱ्या प्रत्येकीला वस्तूंवर जीएसटी द्यावी लागत आहे. त्यामुळे आर्थिक गणिते जुळविताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. मात्र ग्राहकांचा समाधान हेच आमचे भांडवल आम्ही समजत असून आहोत.
> – मिलिंद दहिवलीकर, मूर्तिकार

## रायगड जिल्हा परिषद, पंचायत समिती

# ५९ गटांची अंतिम प्रभाग रचना जाहीर

### २०१७ च्या निवडणुकीतील प्रभाग संख्या कायम

| रायगड | प्रतिनिधी |

**रायगड जिल्हा परिषद आणि १५ पचांयत समित्यांसाठी अंतिम प्रभाग रचना शुक्रवारी जाहीर करण्यात आली. रायगड जिल्हा परिषदेसाठी जिल्हा परिषदेसाठी ५९ प्रभाग आणि पंचायत समित्यांसाठी ११८ प्रभाग रचना कायम राहिली आहे. २०१७ प्रमाणे यावेळीही प्रभाग रचना कायम ठेवण्यात आली आहे.**

२०२२ मध्ये जिल्हा प्रशासनाने प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा तयार करून तो राज्य सरकारकडे पाठवला होता. त्यावेळी २०२१ ची संभाव्य जनगणना लक्षात घेऊन प्रभाग रचना करण्यात आली होती. नवीन प्रभाग रचनेनुसार जिल्हा परिषदेच्या मतदारसंघासाठी संख्या ६६ तर पंचायत समितीच्या प्रभागांची संख्या १३२ होणार होती. म्हणजेच जिल्हा परिषदेचे प्रभाग संख्या सात ने तर पंचायत समितीच्या प्रभागांची संख्या १४ ने वाढणार होती. मात्र कोविड काळामुळे २०२१ ची जनगणना झालीच नाही. त्यामुळे या प्रभाग रचनांवर आक्षेप घेण्यात आले होते. त्यामुळे पुन्हा एकदा २०११ ची जनगणना ग्राह्य धरून प्रभाग रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

त्यामुळे २०१७ मध्ये झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूकीप्रमाणे जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांचे प्रभाग



कायम राहिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाचा विचार न करता निवडणूका तातडीने घ्याव्यात असे आदेश दिल्यानंतर यंत्रणा कामाला लागली आणि ही अधिसूचना जाहीर झाली आहे. प्रारुप आदेशाच्या प्रती जिल्ह्यातील सर्व तहसिलदार कार्यालये आणि पंचायत समिती कार्यालयात पहायला मिळणार आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिली.

पनवेल तालुक्यात सर्वाधिक ८ मतदारसंघ आहेत. अलिबाग तालुक्यात ७ तर कर्जत तालुक्यात ६ मतदारसंघ आहेत. पेणमध्ये ५, महाडमध्ये ५, खालापूर ४, रोहा ४, उरण ४, माणगाव ४, सुधागड २, मरुड २, तळा २, म्हसळा २, पालदापूर २, श्रीवर्धनमध्ये २ अशी मतदारासंघ विभागणी आहे.

**तालुकानिहाय मतदारसंघ**

पनवेल : वावंजे, नेरे, पालीदेवर, पळस्पे, वावेघर, वडघर, गव्हाण, केळवणे

कर्जत : कळंब, कशेळे, माणगाव तर्फे वरेडी, नेरळ, कडाव, मोठे वेणगाव

खालापूर : चौक, वासांबे, सावरोली, आत्करगाव

सुधागड : जांभूळपाडा, राबगाव

पेण : जिते, दादर, वडखळ, महालमिऱ्या डोंगर, शिहू

उरण : नवघर , जाणजे, जासई, चिरनेर,

अलिबाग : शहापूर, आंबेपूर, आवास, थळ, चेंढरे, चौल, कावीर,

मुरूड : कोर्लई, राजपूरी

रोहा : नागोठणे, आंबेवाडी, भुवनेश्वर, घोसाळे

तळा : चरई खुर्द, रहाटाड

माणगाव : निजामपूर, तळाशेत, मोर्बा, गोरेगाव,

म्हसळा : पाभरे, पांगळोली

श्रीवर्धन : बोर्लीपंचतन, आराठी

महाडः बिरवाडी, खरवली, दासगाव, करंजाडी, नडगाव तर्फे बिरवाडी

पोलादपूर : कापडे बुद्रुक, लोहारे

## विहिरीच्या मोटारीची वायर चोरी!

| पाली/वाघोशी | वार्ताहर |

घोटावाडे गावातील ग्रामपंचायतीच्या माध्यमातून बसविण्यात आलेल्या विहिरीच्या मोटारीची विद्युत वायर पुन्हा एकदा मध्यरात्री चोरीला गेल्याने ग्रामस्थांमध्ये प्रचंड संताप पसरला आहे. गावकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत असलेल्या या मोटारीची वायर वारंवार चोरीस जाणे हा गावासाठी मोठा डोकेदुखीचा विषय बनला आहे. गावातील विहिरीतून पाणी टाकीत भरून पुरवले जाते. यासाठी ग्रामपंचायतीकडून खास मोटार आणि वायर लावण्यात आली होती. मात्र ही वायर सतत चोरीला जात असून, याआधी देखील ग्रामस्थांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली होती. पोलिसांनी या चोरीला आळा घालण्यात कसलीही कार्यवाही न केल्याने चोरांचे मनोबल वाढल्याचे ग्रामस्थांचे मत आहे. मध्यरात्री पुन्हा चोरी झाल्याने नागरिकांमध्ये पोलीस यंत्रणेच्या निष्क्रियतेबाबत जोरदार नाराजी व्यक्त केली जात आहे.जर पोलिसांनी तत्काळ कारवाई करून चोरट्यांना पकडले नाही, तर ग्रामस्थांना रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.



## मुरुडमध्ये गौरी-गणपती सणाच्या पार्श्वभूमीवर वाहतुकीचे नियोजन

| मुरुड | प्रतिनिधी |

मुरुड नगरपरिषद व पोलिसांनी गौरी गणपती सणांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सोयीसाठी बाजारपेठेत वाहतुकीचे नियोजन करण्यात आले आहे.

श्री गणेशोत्सव व गौरी सण अवघ्या दोन तीन दिवसांवर असून सणांच्या खरेदीसाठी बाजारपेठेत नागरिक मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते, त्यावेळी बाजारपेठेत ये जा करणाऱ्या वाहनांमुळे वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी एसटी व अवजड वाहतूकीचे उत्तम प्रकारे नियोजन पोलिसांनी केले आहे.

शहरातील मसाळ गल्ली लायब्ररी नाका येथून एस टी सेवा करण्यात आली आहे.

गौरी गणपती सणांच्या अनुषंगाने मुरुड बाजारपेठेत वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये म्हणून चार ठिकाणी बॅरिकेड्स लावण्यात आले असून वाहतूक पोलीस, होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत. त्यामुळे दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन करावे असे आवाहन पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी केले आहे.

दरवर्षी या ठिकाणी खूप गर्दी होत असते व वाहनांच्या वाहतूकी मुळे त्रास होत असतो. यंदा मुरुड पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांनी गौरी गणपती सणांच्या पार्श्वभूमीवर चांगले नियोजन केल्यामुळे ॲड. विनायक शेडगे यांनी समाधान व्यक्त केले.

## नवीन आधार केंदासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**रायगड** : रायगड जिल्ह्यातील नागरिकांचे नवीन आधार काढणे व आधार कार्ड वरील माहिती अद्ययावत करण्याकरीता जिल्ह्यामध्ये सद्यस्थितीत एकूण ७४ आधार संच कार्यान्वित आहेत. जिल्ह्याची लोकसंख्या व आधार केंद्रांची मागणी पाहता नवीन आधार केंद्रांची स्थापना करण्याची आवश्यकता आहे. जिल्ह्यामध्ये नव्याने ९९ आधार केंद्रांची स्थापना करण्याकरीता १५ तालुक्यांमध्ये नवीन आधार केंद्र सुरु करण्यासाठी इच्छुक पात्र असलेल्या आपले सरकार सेवा केंद्र चालकांकडून अर्ज मागविण्यात आले आहेत.

इच्छुकांनी विहीत कागदपत्रासह आपले अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयातील नोंदणी शाखेमध्ये समक्ष २१ ऑगस्ट ते ०८ सप्टेंबर या कालावधीमध्ये जमा करावेत.

## जिल्ह्याचा जीडीपी तीन लाख कोटींवर नेणार

### जिल्हाधिकारी किसन जावळे यांचा संकल्प

| रायगड | प्रतिनिधी |

सध्या जिल्ह्याचा जीडीपी एक लाख पाच हजार कोटी इतका आहे. २०२७-२८ पर्यंत तो १ लाख ८६ हजार कोटी होणार आहे. परंतु लघु उद्योग भारती आणि जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त प्रयत्नांमुळे तो २०२७-२८ पर्यंत ३ लाख कोटींवर नेण्याचा विश्वास जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी व्यक्त केला.

उद्योग सुसंवाद २०२५ कार्यक्रमाचे आयोजन वासुदेव बळवंत फडके सभागृह, पनवेल येथे करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, पनवेल महानगरपालिका उपायुक्त वैभव विधाते, जयेश देढीया, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळया तसेच विविध एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष व लघुउद्योजक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी म्हणाले की, उद्योग विभागाशी निगडित अनेक प्रश्न प्रलंबित आहेत त्यावर तोडगा काढण्यासाठी सर्व विभागांना सोबत घेऊन, चर्चा करून प्रशासन मार्ग काढत आहे. जिल्हा प्रशासन उद्योग सेतू




या उपक्रमाच्या माध्यमातून उद्योजकांचे अडी अडचणी आणि प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करत आहे.

लघु उद्योग भारती हा लघुउद्योजक आणि शासन यामधील दुवा म्हणून काम करत असून ऊर्जेच्या प्रश्नावर त्यांनी यशस्वी मध्यस्थी केली आहे. तसेच इन्कम टॅक्स कलम ४३ एच मध्ये सुधारणा करण्यासाठीही त्यांचा मोलाचा वाटा आहे.

रायगड जिल्ह्यात मरीन क्षेत्राला भरपूर वाव असून कोल्ड स्टोरेज, वेअर हाऊस यांना शासनाकडून मिळणाऱ्या सबसिडीचा उद्योजकांनी लाभ घ्यावा, असेही त्यांनी आवाहन केले. नवी मुंबई विमानतळ, दिघी बंदर, जीएनपीटी बंदर, प्रस्तावित रेवस-रेड्डी महामार्ग यामुळे कोकणात इन्फ्रास्ट्रक्चरचे जाळे निर्माण होणार असून त्याचा फायदा उद्योग क्षेत्राला नक्कीच होणार आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याचे उद्दिष्ट ठेवले असून त्या दिशेने आपण वाटचाल करत आहोत, असेही त्यांनी सांगितले.यावेळी जिल्हाधिकारी यांनी उद्योजकांबरोबर संवाद साधला.

मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, पनवेल महानगरपालिका उपायुक्त वैभव विधाते, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळया यांनी मनोगत व्यक्त केले.

## आयुष्मान कार्डसाठी ३१ ऑगस्ट अंतिम मुदत


| रायगड | प्रतिनिधी |

एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना यांचा लाभमिळावा, यासाठी जिल्हा प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत ३१ ऑगस्ट २०२५ पर्यंत नागरिकांना आयुष्मान भारत गोल्डन कार्ड तयार करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

लाभार्थ्यांना प्रतिवर्ष पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार असून, यामध्ये १ हजार ३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया व विशेष उपचारांचा समावेश आहे. तसेच कुटुंबातील ७० वर्षांवरील सदस्यांना आयुष्मान भारत वय वंदना कार्डच्या माध्यमातून अतिरिक्त पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार आहेत. आरोग्य योजनांचा लाभ घेण्यासाठी कुटुंबातील प्रत्येक सदस्याकडे आयुष्मान भारत गोल्ड कार्ड असणे बंधनकारक आहे. आशा स्वयंसेविका, आपले सरकार सेवा केंद्र, तसेच स्वस्त धान्य दुकानदार यांच्या माध्यमातूनही कार्ड तयार करता येईल. आयुष्मान भारत गोल्ड कार्ड सरकारी तसेच खासगी रुग्णालयांमध्ये लाभार्थी उपचार घेऊ शकतात. जास्तीत जास्त नागरिकांनी या मोहिमेत सहभाग नोंदवावा असे, आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## नोकरी ! शिक्षक पाहिजेत

संपूर्ण रायगड जिल्ह्यातील पदवीधर आणि द्विपदवीधर उमेदवारांना नोकरीची संधी

नवोदित, अनुभवी, निवृत्त शिक्षकांसाठी अलिबाग येथील खाजगी कोचिंग क्लासेसमध्ये पूर्णवेळ/अर्धवेळ शिक्षक पदांची भरती.

**विषय** : इ. आठवी ते दहावीचे सर्व विषय
इ.अकरावी-बारावी Physics, Chemistry, Maths, Biology, English

**वेतन** : रुपये १२,००० ते २५,०००/- दर महिना

इच्छुक उमेदवारांनी आपला बायोडाटा खालील ई-मेलवर स्वतःचा भ्रमणध्वनी नमूद करुन पाठवावा

shikshaknokri@gmail.com

### जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. महेश संजय शिरसाट यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्री. प्रकाश वसंत रणदिवे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. नेरळ, आनंदवाडी, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ६३ | १५ | ४७०-०० | ४७-०० |
| जुना सर्व्हे नं. २५६/१+२पैकी प्लॉट नं. १५ ६अ (१) | | | |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. २५/०८/२०२५.

**ॲड. सुमित दत्तात्रेय कराळे.**
पत्ता - ममदापुर, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो. - ९१६८९७८४३८

### PANVEL MUNICIPAL CORPORATION

TENDER NOTICE- Third Call
Tender No :- PMC/CE/PMAY/52/2025-26
**CITY ENGINEER'S OFFICE (PMAY DEPARTMENT)**

INVITATION OF TENDER FOR THE WORKS OF "Mixed Use Development under PMAY with Rehabilitation Of Slum Dwellers Of Plot No. 307A At. Panvel,Shivajinagar, Dist. Raigad, Maharashtra 410206"-Third Call

Offers by way of e-tendering (Lump Sum PPP form) are invited by the Commissioner, Panvel Municipal Corporation from contractors in e-tendering system for following works.

| Name of work | Amount of E.M.D (Rs) | Time limit in Calendar months | Cost of Tender Document (Rs.) |
|---|---|---|---|
| Mixed Use Development under PMAY with Rehabilitation Of Slum Dwellers Of Plot No. 307A At. Panvel, Shivajinagar, Dist.Raigad, Maharashtra 410206 | Rs. 12,50,000/- | 36 Months (Including Monsoon) | Rs.5,000/- + 18% GST Total Rs.5900/- (Non refundable) |

The details of above works, such as Security Deposit, Earnest Money Deposit, Terms & Conditions of the Tender are available on website www.mahatenders.gov.in. Tenders for these works are to be submitted by e-tendering system. Bidders can avail the e-tender document from 25/08/2025 from 5.00 P.M. to 02/09/2025 up to 5.00 PM. Bidders should submit their offer by way of e-tendering system only. The last date of Submission by way of e-tendering will be 03/09/2025 up to 5.00 PM. Commissioner, Panvel Municipal Corporation reserves the right to accept or reject any or all tender without giving any reason there of.

Signed by
**Ganesh Kisanrao Shete**
Additional Commissioner-I
Panvel Municipal Coroporation
Panvel-410 206

### जाहीर सूचना

खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत व गाव मापगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र. १४ धारक जमिनीचा भाग बनत असलेल्या मोजमापित २० आर अर्थात २००० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या मालमत्तेसंदर्भात घनश्याम म हाबळेश्वर हेगडे (मालक) यांच्या हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करण्यासाठी याद्वारे सूचना देण्यात येत आहे.

कोणीही व्यक्ती/घटक/व्यक्ती यांमध्ये कोणतीही बँक वा वित्तीय संस्था यांचा समावेश असेल, यांचा सदर मालमत्तावा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात वा त्यावरील निर्माणासमवेत कायद्याच्या अंमलबजावणीअंतर्गत विकास हक्क, एफएसआय/टीडीआर वा अन्य स्वरूपात, यामध्ये उत्तराधिकार, विनिमय, हिस्सा, संपादन, विभाजन, हस्तांतरण, करार, विक्री, अभिहस्तांकन, मृत्यूपश्चात वारसा, प्रभार, गहाण, तारणगहाण, परवानगी, उप-परवानगी, भाडेकरार, उप-भाडेकरार, धारणाधिकार, सुविधाधिकार, विचाराधीन विवाद, अनुज्ञप्ती, गहाण, हमी, सुविधाधिकार, भेट, न्यास, देखभाल, ताबा, निषेधाज्ञा, कर्जे, आगाऊ रकमा, जप्ती वा भार, निषेधाज्ञा वा लाभ हक्क काणत्याही न्यासाअंतर्गत, पूर्व क्रय अधिकार वा जुना वहिवाट हक्क वा कोणताही विक्री करार/कंत्राटाअंतर्गत वा अन्य वासलात वा अन्य कोणत्याही स्वरूपात किंवा प्रलंबित दावाखटला, भागीदारी, संयुक्त उद्यम, कुटुंब व्यवस्था/तडजोड वा कोणतेही न्यायालय वा न्यायाधिकरणाद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकूम वा अन्य कोणत्याही स्वरूपात, यामध्ये कायद्याच्या अंमलबजावणीद्वारे आदेशांचा समावेश आदी स्वरूपात कोणताही दावा, हिस्सा, हक्क, अधिकार, हितसंबंध वा मागणी असल्यास त्यांनी त्यासंदर्भात अधोहस्ताक्षरितांना लिखित स्वरूपात कागदोपत्री पुराव्याच्या प्रमाणित सत्यापित प्रतींसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर सूचित करावे.

सदर प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सहाय्यक दस्तावेजांसमवेत अशी कोणतीही सूचना/दावा प्राप्त न झाल्यास, मालक हे मालमत्तेचे संपूर्ण हक्कदार आहेत असे समजण्यात येईल व मालमत्तेसंदर्भात कोणताही विपरित हक्क, अधिकार, हितसंबंध वा मागणी नाही असे सम जण्यात येईल व ती सर्व भारांपासून मुक्त समजण्यात येईल व आमचे अशील हे अशा दाव्याच्या वा मागणीच्या कोणत्याही संदर्भाविना मालकांसमवेत मालमत्तेसंदर्भात व्यवहार पूर्ण करण्यास मुक्त असतीव व अशा व्यक्तींचे दावे, काही असल्यास, ते अधित्यागित वा परित्यागित समजण्यात येतील व ते आमच्या अशिलांवर बंधनकारक नसतील.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे विवरण)**

गाव मापगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील गट क्र. १४ धारक मोजमापित ६१.९ आर अर्थात ६१९० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जमिनीचा भाग बनत असलेल्या मोजमापित २० आर अर्थात २००० चौरस मीटर क्षेत्रफळाच्या जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड.

दिनांक : २५ ऑगस्ट, २०२५

**मेहेरनोश जे. हुमरानवाला**
**भागीदार**
ताटवा लीगल मुंबई
वकील व सॉलिसिटर्स
१ ला मजला, जन्मभूमी भवन,
जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

### जाहीर सूचना

खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत व गाव सोगाव व मापगाव येथील, एकत्रितरीत्या सदर मालमत्ता म्हणून उल्लेखित या जमिनीच्या संबंधित भूखंडांचे सादीक नझीर कूर (मालक) यांच्या हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करण्यासाठी याद्वारे सूचना देण्यात येत आहे.

कोणीही व्यक्ती/घटक/व्यक्ती यांमध्ये कोणतीही बँक वा वित्तीय संस्था यांचा समावेश असेल, यांचा सदर मालमत्तावा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात वा त्यावरील निर्माणासमवेत कायद्याच्या अंमलबजावणीअंतर्गत विकास हक्क, एफएसआय/टीडीआर वा अन्य स्वरूपात, यामध्ये उत्तराधिकार, विनिमय, हिस्सा, संपादन, विभाजन, हस्तांतरण, करार, विक्री, अभिहस्तांकन, मृत्यूपश्चात वारसा, प्रभार, गहाण, तारणगहाण, परवानगी, उप-परवानगी, भाडेकरार, उप-भाडेकरार, धारणाधिकार, सुविधाधिकार, विचाराधीन विवाद, अनुज्ञप्ती, गहाण, हमी, सुविधाधिकार, भेट, न्यास, देखभाल, ताबा, निषेधाज्ञा, कर्जे, आगाऊ रकमा, जप्ती वा भार, निषेधाज्ञा वा लाभ हक्क काणत्याही न्यासाअंतर्गत, पूर्व क्रय अधिकार वा जुना वहिवाट हक्क वा कोणताही विक्री करार/कंत्राटाअंतर्गत वा अन्य वासलात वा अन्य कोणत्याही स्वरूपात किंवा प्रलंबित दावाखटला, भागीदारी, संयुक्त उद्यम, कुटुंब व्यवस्था/तडजोड वा कोणतेही न्यायालय वा न्यायाधिकरणाद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकूम वा अन्य कोणत्याही स्वरूपात, यामध्ये कायद्याच्या अंमलबजावणीद्वारे आदेशांचा समावेश आदी स्वरूपात कोणताही दावा, हिस्सा, हक्क, अधिकार, हितसंबंध वा मागणी असल्यास त्यांनी त्यासंदर्भात अधोहस्ताक्षरितांना लिखित स्वरूपात कागदोपत्री पुराव्याच्या प्रमाणित सत्यापित प्रतींसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर सूचित करावे.

सदर प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सहाय्यक दस्तावेजांसमवेत अशी कोणतीही सूचना /दावा प्राप्त न झाल्यास, मालक हे मालमत्तेचे संपूर्ण हक्कदार आहेत असे समजण्यात येईल व मालमत्तेसंदर्भात कोणताही विपरित हक्क, अधिकार, हितसंबंध वा मागणी नाही असे समजण्यात येईल व ती सर्व भारांपासून मुक्त समजण्यात येईल व आमचे अशील हे अशा दाव्याच्या वा मागणीच्या कोणत्याही संदर्भाविना मालकांसमवेत मालमत्तेसंदर्भात व्यवहार पूर्ण करण्यास मुक्त असतीव व अशा व्यक्तींचे दावे, काही असल्यास, ते अधित्यागित वा परित्यागित समजण्यात येतील व ते आमच्या अशिलांवर बंधनकारक नसतील.

अनुसूची
(मालमत्तेचे विवरण)

तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील नमूद गट क्रमांक धारकांचा पुढील विवरणीत जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड -

| अ.क्र. | गट क्र. | गाव | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | १९६ | सोगाव | ३४ आर अर्थात ३४०० चौरस मीटर |
| २. | १४ | मापगाव | २१.९ आर अर्थात २१९० चौरस मीटर |

दिनांक : २५ ऑगस्ट, २०२५

**मेहेरनोश जे. हुमरानवाला**
**भागीदार**
ताटवा लीगल मुंबई
वकील व सॉलिसिटर्स
१ ला मजला, जन्मभूमी भवन,
जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

### जाहीर सूचना

खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत व यापुढे एकत्रितरीत्या मालमत्ता म्हणून उल्लेखित गाव सोगावच्या गट क्र. २०३ धारक जमिनीतून १२ फूट रुंद हक्क मार्गासमवेत गाव सोगाव व मापगाव येथील संबंधित जमिनीच्या संबंधित भूखंडासंदर्भात मकरंद सुरेश नार्वेकर (मालक) यांच्या हक्क, अधिकार व हितसंबंधांची चौकशी करण्यासाठी याद्वारे सूचना देण्यात येत आहे.

कोणीही व्यक्ती/घटक/व्यक्ती यांमध्ये कोणतीही बँक वा वित्तीय संस्था यांचा समावेश असेल, यांचा सदर मालमत्तावा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात वा त्यावरील निर्माणासमवेत कायद्याच्या अंमलबजावणीअंतर्गत विकास हक्क, एफएसआय/टीडीआर वा अन्य स्वरूपात, यामध्ये उत्तराधिकार, विनिमय, हिस्सा, संपादन, विभाजन, हस्तांतरण, करार, विक्री, अभिहस्तांकन, मृत्यूपश्चात वारसा, प्रभार, गहाण, तारणगहाण, परवानगी, उप-परवानगी, भाडेकरार, उप-भाडेकरार, धारणाधिकार, सुविधाधिकार, विचाराधीन विवाद, अनुज्ञप्ती, गहाण, हमी, सुविधाधिकार, भेट, न्यास, देखभाल, ताबा, निषेधाज्ञा, कर्जे, आगाऊ रकमा, जप्ती वा भार, निषेधाज्ञा वा लाभ हक्क काणत्याही न्यासाअंतर्गत, पूर्व क्रय अधिकार वा जुना वहिवाट हक्क वा कोणताही विक्री करार/कंत्राटाअंतर्गत वा अन्य वासलात वा अन्य कोणत्याही स्वरूपात किंवा प्रलंबित दावाखटला, भागीदारी, संयुक्त उद्यम, कुटुंब व्यवस्था/तडजोड वा कोणतेही न्यायालय वा न्यायाधिकरणाद्वारे मंजूर कोणताही निवाडा, आदेश वा हुकूम वा अन्य कोणत्याही स्वरूपात, यामध्ये कायद्याच्या अंमलबजावणीद्वारे आदेशांचा समावेश आदी स्वरूपात कोणताही दावा, हिस्सा, हक्क, अधिकार, हितसंबंध वा मागणी असल्यास त्यांनी त्यासंदर्भात अधोहस्ताक्षरितांना लिखित स्वरूपात कागदोपत्री पुराव्याच्या प्रमाणित सत्यापित प्रतींसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर सूचित करावे.

सदर प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सहाय्यक दस्तावेजांसमवेत अशी कोणतीही सूचना /दावा प्राप्त न झाल्यास, मालक हे मालमत्तेचे संपूर्ण हक्कदार आहेत असे समजण्यात येईल व मालमत्तेसंदर्भात कोणताही विपरित हक्क, अधिकार, हितसंबंध वा मागणी नाही असे समजण्यात येईल व ती सर्व भारांपासून मुक्त समजण्यात येईल व आमचे अशील हे अशा दाव्याच्या वा मागणीच्या कोणत्याही संदर्भाविना मालकांसमवेत मालमत्तेसंदर्भात व्यवहार पूर्ण करण्यास मुक्त असतीव व अशा व्यक्तींचे दावे, काही असल्यास, ते अधित्यागित वा परित्यागित समजण्यात येतील व ते आमच्या अशिलांवर बंधनकारक नसतील.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे विवरण)**
**भाग - १**

गाव सोगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील निर्देशित गट क्रमांकाच्या जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड :

| अ.क्र. | गट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|
| १. | १८२ | १०१०० चौरस मीटर |
| २. | १९२/२ | ३७०० चौरस मीटर |
| ३. | १९७ | ५८०० चौरस मीटर |
| ४. | १९३ | २२०० चौरस मीटर |
| ५. | १९४ | ४७०० चौरस मीटर |
| ६. | १७७ | २१०० चौरस मीटर |
| ७. | १७८ | २६०० चौरस मीटर |
| ८. | १७९/ १८०/ १८१/२ | १३२०० चौरस मीटर |
| ९. | १८३/१८४ | १०६०० चौरस मीटर |
| १०. | २०३ | १००चौरसमीटर,यामध्ये१२ फूट रुंद स्ट्रीपचा समावेश, मालमत्तेच्या प्रवेश हक्काच्या सर्वंकष हक्कासमवेत. |

**भाग २**

गाव मापगाव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील खालील निर्देशित गट क्रमांकाच्या जमिनीचा सर्व तो भाग व भूखंड :

| अ.क्र. | गट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|
| १. | २५३ | ३९८० चौरस मीटर |
| २. | २५४ | २५५० चौरस मीटर |
| ३. | २५६ | २४५० चौरस मीटर |
| ४. | २५८ | ११९० चौरस मीटर |
| ५. | २५९ | ६३१० चौरस मीटर |
| ६. | १३ | १६८० चौरस मीटर |
| ७. | १४ | २००० चौरस मीटर |
| ८. | १५/१ | ३०१० चौरस मीटर |
| ९. | १५/२ | ३०१० चौरस मीटर |

दिनांक : २५ ऑगस्ट, २०२५

**मेहेरनोश जे. हुमरानवाला**
**भागीदार**
ताटवा लीगल मुंबई
वकील व सॉलिसिटर्स
१ ला मजला, जन्मभूमी भवन,
जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

# चेतेश्वर पुजाराचा क्रिकेटला रामराम



**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भारताचा टेस्ट स्पेशालिस्ट अन् 'द वॉल २.०' चेतेश्वर पुजाराने सर्व प्रकारच्या क्रिकेटममधून निवृत्ती जाहीर केली आहे. भारतीय क्रिकेट संघाचे प्रतिनिधित्व करण्याचे स्वप्न पूर्ण झाल्याबद्दल त्याने कृतज्ञता देखील व्यक्त केली आहे. पुजारा भारताचा सर्वोत्तम कसोटीपटूंपैकी एक राहिला असून त्याने अनेक विक्रम केले आहेत.

भारतीय क्रिकेटर चेतेश्वर पुजाराने रविवारी (दि.२४) मोठा निर्णय घेतला. त्याने सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. त्याने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत याबाबत माहिती दिली.

चेतेश्वर पुजाराने पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिले की, भारतीय जर्सी परिधान करणे, राष्ट्रगीत गाणे आणि प्रत्येक क्षणी मैदानात उतरताना सर्वोत्तम देणे, या सर्व गोष्टींना शब्दात मांडणे कठीण आहे. प्रत्येक चांगल्या गोष्टीचाही शेवट असतो आणि सर्व प्रकारच्या भारतीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा मी अत्यंत कृतज्ञपूर्वक निर्णय घेतला आहे. सर्वांनी दिलेल्या पाठिंब्यासाठी आणि प्रेमासाठी आभार, असे ही पुजाराने पोस्टमध्ये लिहिले आहे.

तसेच, पुजाराने या पोस्टमध्ये दोन फोटो शेअर केले असून त्यात त्याने म्हटले की, राजकोटसारख्या छोट्या शहरात पालकांसोबत असताना त्याने लहानपणी भारतीय क्रिकेट संघाचे प्रतिनिधित्व करण्याचे स्वप्न पाहिले होते. या खेळाने त्याला अनेक गोष्टी दिल्या आहेत. त्याला या खेळामुळे राज्याचे आणि देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. तसेच, चेतेश्वर पुजाराने त्याच्या पोस्टमधून बीसीसीआय, सौराष्ट्र क्रिकेट असोसिएशन यांच्यासह सर्व संघांचे, आयपीएल फ्रँचायझीचे आणि काऊंटी क्रिकेट संघांचेही आभार मानले आहेत. याशिवाय गुरु, प्रशिक्षक, मार्गदर्शक, संघसहकारी, सपोर्ट स्टाफ, पंच, पत्रकार, ग्राऊंड स्टाफ, स्पॉन्सर्स, भागीदार, मॅनेजमेंट टीम यासर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आहे. तसेच, त्याने प्रत्येक क्षणी त्याला साथ देणाऱ्या त्याच्या कुटुंबाचेही आभार मानले आहेत.

चेतेश्वर पुजाराने ऑक्टोबर २०१० मध्ये कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते. तो जवळपास १० वर्षे सलग भारतासाठी कसोटी क्रिकेट खेळला. राहुल द्रविडच्या निवृत्तीनंतर तो भारताचा तिसऱ्या क्रमांकावरील तो सर्वात भरवशाचा खेळाडू बनला. पुजाराला बाकी क्रिकेट प्रकारात फारशी संधी मिळाली नसली, तरी त्याने कसोटी क्रिकेटमध्ये त्याची वेगळी ओळख निर्माण केली. भारताने २०१८-१९ आणि २०२०-२१ दरम्यान ऑस्ट्रेलिया दौऱ्यात मिळवलेल्या कसोटी मालिका विजयांमध्येही पुजाराचे योगदान महत्त्वाचे राहिले होते. त्याने ऑस्ट्रेलिया दौऱ्यात तर तब्बल ९२८ चेंडू चार कसोटीत खेळले होते. तो २००५ साली १९ वर्षांखालील भारतीय संघाकडून विश्वचषकही खेळला. त्याने २७८ प्रथम श्रेणी सामने खेळताना तब्बल ६६ शतके आणि ८१ अर्धशतकांसह २१,३०१ धावा केल्या आहेत. त्यातील भारतासाठी खेळलेल्या १०३ कसोटी सामन्यांत त्याने १९ शतकांसह ७,१९५ धावा केल्या आहेत. नाबाद २०६ ही त्याची सर्वोत्तम खेळी राहिली. त्याने भारतासाठी ६ एकदिवसीय सामने खेळताना ५१ धावा केल्या आहेत.

### दिग्गज खेळाडू झाले व्यक्त

**सचिन तेंडुलकरने म्हटले की, पुजारा, तू तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला येणे, हे नेहमीच दिलासा देणारे होते. तू जेव्हाही खेळला, तेव्हा शांतता, धैर्य आणि कसोटी क्रिकेटसाठी अपार निष्ठा ठेवून खेळलास. तुझी भक्कम तंत्रशुद्ध फलंदाजी, संयम आणि दबावातीलही स्थिरता संघासाठी नेहमीच आधार देणारी होती. तुझ्या शानदार कारकिर्दीसाठी अभिनंदन. अजिंक्य रहाणेने लिहिले की, पुज्जी, तुझ्या शानदार कारकिर्दीसाठी अभिनंदन. तुझ्यासोबत खेळतानाच्या प्रत्येक क्षणाचा आणि विजयाचा आनंद घेतला आहे. युवराज सिंगने लिहिले की, देशासाठी नेहमीच त्याचे मन, शरीर आणि आत्मा समर्पित करणारा. पुज्जी तुझ्या विलक्षण कारकिर्दीसाठी अभिनंदन. तसेच, भारताचा मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरने लिहिले की, वादळ उठले असतानाही तो खंबीरपणे उभा राहिला. आशा मावळत असतानाही तो जिद्दीने लढला. अभिनंदन पुज्जी.**

## निवडक



### तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्राची 'गाथा'

**मुंबई** : कॅनडा येथे सुरु असलेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या गाथा खडके व शर्वरी शेंडेने जियाना कुमारच्या साथीने ऐतिहासिक कांस्यपदकाचा कामगिरी केली आहे. अमेरिकेच्या संघाचा ६-० ने दणदणीत पराभव करत विजय नोंदवून १८ वर्षांखालील रिकर्व्ह प्रकारात हा पराक्रम केला आहे. तत्पुर्वी पात्रता फेरीत भारत चौथ्या स्थानावर होता. उपउपांत्यपूर्व फेरीत मेक्सिको संघावर ६-० ने सेटने पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली. उपांत्यपूर्व लढतीत बलाढ्य जपान संघाचा ५-३ सेटने पराभव भारताने उपांत्य फेरीत मुसंडी मारली होती. उपांत्य फेरीत कोरिया संघाने भारताला कडवी झुंज दिली. ही लढत ६-२ सेटपर्यंत रंगली. अखेर १ गुण फरकाने कोरियाने निसटता विजय संपादन केला. कांस्य पदकाच्या लढतीत अमेरिकेला भारताने एकाही विजयाची संधी दिली नाही. ५५-५३, ५९-५६, ५५-५२ गुणांसह ६-० सेटने भारताने ऐतिहासिक कांस्य पदकाचर मोहर उमटवली. भारतीय संघांचे प्रशिक्षक प्रा. रणजित चामले हे या संघांचे प्रशिक्षक होते. रणजीत सरांच्या प्रोत्साहनामुळे हे यश हाती आले असे सोलापूरच्या गाथा खडके हीने सांगितले.

### उरणच्या मैत्रेय मोकलचे 'रौप्य' यश




**खरोशी:** झारखंड येथे १८ ते २१ ऑगस्ट दरम्यान झालेल्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत उरणच्या मैत्रेय मोकल याने ९३ किलो वजनी गटामध्ये राष्ट्रीय स्तरावर रौप्यपदक पटकावले आहे. यापूर्वी अहमदनगर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्यस्तरीय स्पर्धेत त्याने सुवर्णपदक मिळवले होते. त्या कामगिरीच्या जोरावर त्याची निवड राष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली होती. राष्ट्रीय स्पर्धेत त्याने एकूण ६५८ किलो वजन उचलून ही कामगिरी साध्य केली आहे. या यशामध्ये शिवछत्रपती पुरस्कार विजेते संतोष शिंदे यांच्या मार्गदर्शनाचा मोलाचा मोठा वाटा आहे. त्यांच्या मेहनतीमुळेच मैत्रेयला हे यश संपादन करता आले. या स्पर्धेत शेकडो स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. तसेच, या रौप्यपदकाच्या जोरावर त्याची निवड आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली असून ती नोव्हेंबरमध्ये भूतान येथे होणार आहे. त्याच्या या चमकदार कामगिरी बद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. तसेच, त्याच्या पुढील वाटचालीसाठी सर्वांकडून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

### खालापूरात सायकलथॉन स्पर्धा

**खोपोली:** भारत सरकारच्या निर्देशानुसार व फिट इंडिया मोहिमेअंतर्गत रायगड जिल्हा पोलीस आयोजित सायकलथॉनचे आयोजन खालापूर तालुका पोलीस यंत्रणेच्या माध्यमातून करण्यात आले होते. या अभूतपूर्व अशा सायकल स्पर्धेच्या उद्घाटनानिमित्त रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षिका आंचल दलाल यांची विशेष उपस्थिती होती. पळस दरी ते हॉलिडे बँक्वेट हॉल अंजरूण या दरम्याच्या १० किलोमीटर अंतराच्या स्पर्धेला त्यांनी हिरवा झेंडा दाखवला.खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झालेल्या या सायकलथॉन स्पर्धेत अविनाश पोळ यांनी २०.२२ सेकंदात १० किलोमीटरचे अंतर पार करून प्रथम क्रमांक मिळवला, तर आर्यन सणस आणि अविनाश पाटील यांनी काही सेकंदाच्या फरकाने अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. त्याच बरोबर वय वर्षे ६ ते ६० पेक्षा अधिक वयाच्या सायकलपटूंनी स्पर्धेत चुरस दाखविल्याबद्दल सर्वांना प्रशस्तीपत्रक देण्यात आले. यावेळी खालापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल मेहुल, कर्जतचे उप विभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड, निवासी उपविभागीय पोलीस अधिकारी तानाजी नारनवर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्यासह सचिन हिरे, संजय बांगर, संदीप भोसले, सरिता चव्हाण, हॉलिडे बँक्वेट हॉलचे मालक अब्दुल अजीज बारुदगर व अझीम कर्जीकर यांनी सायकलथॉन स्पर्धेच्या आयोजनात विशेष भूमिका बजावली. तसेच, स्पर्धेदरम्यान हेल्प फाऊंडेशन, सायकल इंडिया, यशवंती हायकर्स, खोपोली व्यापारी असोसिएशन व करियर कोचिंग क्लासेस इत्यादी संस्थांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

# वानखेडेवर शरद पवार संग्रहालयाचे उद्घाटन






**| मुंबई | प्रतिनिधी |**

कितीही नाव कमावले आणि अनुभव पाठीशी असला तरी क्रिकेटमध्ये प्रत्येक जण कायमच विद्यार्थी असतो, कोणीही मास्टर नसतो, असे अनुभवाचे बोल भारताचे महान फलंदाज सुनील गावसकर यांनी जाहीरपणे बोलून दाखवले आहे. शनिवारी (दि.२३) मुंबई क्रिकेट संघटनेच्या संग्रहालयाचे उद्घाटन पार पडले. या संग्राहलायाला ज्येष्ठ राजकारणी तथा मुंबई, भारतीय क्रिकेट आणि आयसीसीचे माजी अध्यक्ष शरद पवार यांचे नाव देण्यात आले आहे. त्याचबरोबर शरद पवार आणि सुनील गावसकर यांच्या पुतळ्याचेही अनावरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

भारतीय क्रिकेटची पंढरी समजली जाणारे मुंबई क्रिकेट आणि वानखेडे स्टेडियमच्या वास्तूमध्ये अनेक विक्रम आणि इतिहास घडलेले असले तरी मुंबई क्रिकेटचा गौरव नव्या पिढीसमोर दाखवण्यासाठी संग्रहालय नव्हते. आता वानखेडे स्टेडियमच्या वास्तूतच डिजिटल स्वरूपाचे कोंदण असलेले अद्ययावत संग्रहालय उभे राहिले आहे. मुंबई, भारतीय क्रिकेट आणि आयसीसीचे माजी अध्यक्ष शरद पवार यांचे नाव या संग्रहालयाला देण्यात आले आहे. काही वर्षांपूर्वी याच मैदानावर भारताचा मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांचा पुतळा उभारण्यात आला होता. आता या वास्तूच्या द्वारावर शरद पवार यांच्यासह सुनील गावसकर यांच्या पुतळ्याचेही अनावरण करण्यात आले आहे. दरम्यान, स्टेडियममध्ये आपलाच पुतळा पाहून सुनील गावसकर भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.

अनेक विक्रमांचे बादशहा अशी गावसकर यांची ओळख होती. त्यांनी शालेय क्रिकेटपासून आपला ठसा उमटवलेला होता. तरी देखील त्यांना मुंबई रणजी संघात स्थान मिळवण्यासाठी अडीच वर्षे वाट पाहावी लागली होती. त्याची आठवण सांगताना गावसकर म्हणाले की, तो दुलीप करंडकाचा सामना होता. त्यातील २२ पैकी २१ खेळाडू हे भारतीय संघात स्थान मिळवण्यासाठी खेळत होते. तर, मी मुंबई रणजी संघात संधी मिळण्याच्या प्रतीक्षेत होतो. त्यानंतर अडीच वर्षे मला रणजी संघात स्थान मिळाले नव्हते. मला पुढच्या सामन्यात संधी मिळेल, असे सांगण्यात येत होते. अखेर कर्णधार अजित वाडेकर यांनी मला अंतिम सामन्यात खेळवले, ते नेहमीच माझ्या पाठीशी उभे असायचे. हे संग्रहालय केवळ मुंबई क्रिकेटपुरते मर्यादित नसावे तर आंतरराष्ट्रीय क्रिकेटचेही प्रतिनिधित्व असावे, अशी सूचना गावसकर यांनी केली. कारण परदेशातील त्यांच्या संग्रहालयात आपल्या भारतीय क्रिकेटचाही उल्लेख असतो आणि स्थान दिलेले असते, असे गावसकर म्हणाले.

यावेळी बोलताना शरद पवार म्हणाले की, १९६२ नंतर कॉलेजमधून मुंबईत आलो तेव्हा सर्वप्रथम मी येथील क्रिकेटची मैदाने पाहण्यास प्राधान्य दिले. मैदाने हीच तुमच्या खेळातील प्रगतीची मापक असतात, असे ते म्हणाले. पुढे बोलताना ते म्हणाले की, मुंबई क्रिकेटसाठी आजचा दिवस फार महत्त्वाचा आहे. हजारो खेळाडू वेगवेगळ्या स्तरावर येथे क्रिकेट खेळत असतात. ज्यांनी मुंबईचे क्रिकेट घडवले, जगातही नाव मिळवून दिले, अशा मुंबई क्रिकेटचा इतिहास नव्या पिढीला समजणे आवश्यक आहे आणि त्यासाठी संग्रहालयाची अत्यंत्य गरज होती. वानखेडेवरच हे संग्रहालय तयार केले हे फार महत्त्वाचे आहे, त्यामुळे या सर्वांचे अभिनंदन आणि धन्यवाद देतो, असे शरद पवार यांनी सांगितले.

**मुंबई क्रिकेट संघटनेकडून दिग्गजांचा खास सन्मान**

**शरद पवारांसह सुनिल गावसकर यांच्या पुतळ्याचे अनावरण**

**लिटिल मास्टर भावूक**

### 'क्रिकेट ही माझी आई'



**याप्रसंगी गावसकर यांनी काहीसे भावनिक होऊन स्वतःच्या शालेय क्रिकेटपासून सुरू झालेला प्रवास उलगडला. स्वतःचा पुतळा पाहून ते म्हणाले, पुतळ्यासाठी माझा चेहरा असला तरी तो अगदी मुंबईतील टेनिस क्रिकेट, शालेय, कॉलेज, क्लब आणि रणजी क्रिकेटपटूंचे एकत्रित प्रतीक आहे. हा माझ्या एकट्याचा गौरव नसून सर्वांचा आहे. मुंबई क्रिकेट ही माझी आई आहे आणि या आईने हात धरून मला पुढे आणले. आम्ही आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळत असताना तेव्हाची परिस्थिती फार वेगळी होती. माझे मामा आणि माजी आंतरराष्ट्रीय खेळाडू माधव मंत्री यांच्याकडून शिस्त शिकलो, त्याचा फायदा मला पुढे झाला. म्हणूनच कितीही मोठे खेळाडू झालात तरी शिकण्याची वृत्ती सोडू नका. प्रत्येक दिवस नवे काही तरी शिकवणारा असतो, त्यामुळेच कोणीही मास्टर होत नाही. तो कायमच विद्यार्थी असतो, असा उल्लेख सुनिल गावसकर यांनी आवर्जून केला.**

## पीएनपीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जिल्हा क्रीडा अधिकारी अलिबाग-रायगड यांच्या विद्यमाने तालुकास्तरीय शालेय योगासना क्रीडा स्पर्धा नेहुली येथील क्रीडा संकुलात पार पडली. या स्पर्धेत वेश्वीतील पीएनपी होली चाईल्ड स्कूलच्या विद्यार्थ्यांने घवघवीत यश प्राप्त केले.

या स्पर्धेत मुलांच्या १४ वर्ष वयोगटात तनिष्क रामनाथकर याने प्रथम तर स्वयंम पुजारीब याने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. मुलींच्या वयोगटात अनन्या पाटील हिने प्रथम तर यज्ञ म्हात्रे हिने तृतीय क्रमांक पटकावला आहे. मुलांच्या १७ वर्ष वयोगटात हर्ष कडवे याने द्वितीय तर साई थळे याने तृतीय क्रमांक पटकावला आहे. मुलींच्या वयोगटात मनस्वी मळेकर हिने प्रथम तर लावण्या कानगुटकर हिने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. मुलांच्या १९ वर्ष वयोगटात ओम बालके प्रथम, श्लोक रामनाथकर द्वितीय, सानिध्य म्हात्रे तृतीय, करण भगत चतुर्थ तर संजीव पाटील याने पंचम क्रमांक पटकावला आहे. तर, मुलींच्या वयोगटात लावण्या पाटील प्रथम, मनस्वी सावंत द्वितीय, आर्या पेडणेकर तृतीय, मदिहा मुकादम चतुर्थ तर रिंजल चितळे हिने पंचम क्रमांक पटकावला आहे. त्याचबरोबर, विजेत्यांची जिल्हास्तरीय योगासना क्रीडा स्पर्धेत निवड झाली आहे. या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा नृपाल पाटील, होली चाईल्ड एसएससी बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले, उपमुख्याध्यापिका शर्मिला शेटे, क्रीडा मार्गदर्शक अक्षय डाकी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



## कुस्ती स्पर्धेत पीएनपीचा दरारा



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

जिल्हा क्रीडा अधिकारी अलिबाग रायगड व कुस्ती प्रशिक्षण केंद्र वाडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग तालुकास्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये पीएनपीच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

मुलींच्या १४ वर्ष वयोगटातील ३० किलो वजनी गटात त्रिशा जाधव, ३३ किलो वजनी गटात आफ्रा मणियार, ५० किलो वजनी गटात अनन्या पाटील यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. मुलांच्या ७५ किलो वजनी गटात निलेश मालुसरे याने प्रथम क्रमांक पटाकवला आहे. मुलांच्या १७ वर्ष वयोगटातील ६० किलो वजनी गटात अंश किल्लेकर व ७१ किलो वजनी गटात निसर्ग पाटील यांनी द्वितीय क्रमांक, ९२ किलो वजनी गटात तस्मय कोळी याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. मुलींच्या १७ वर्ष वयोगटातील ४३ किलो वजनी गटात लावण्या पाटील व ४६ किलो वजनी गटात मनस्वी मळेकर यांनी द्वितीय क्रमांक पटकावला आहे. मुलांच्या १९ वर्ष वयोगटातील ७४ किलो वजनी गटात आर्यन मयेकर, ७९ किलो वजनी गटात करण भगत, ९२ किलो वजनी गटात तन्मय लखन यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर, मुलींमध्ये ५० किलो वजनी गटात लावण्या कनगुटकर, ५३ किलो वजनी गटात निखि गावंड, ५९ किलो वजनी गटात मदिहा मुकादम, ६२ किलो वजनी गटात आर्या पेडणेकर, ६५ किलो वजनी गटात यज्ञा म्हात्रे, ६८ किलो वजनी गटात संचिता बना, ७२ किलो वजनी गटात सई पाटील व ७६ किलो वजनी गटात मनस्वी सावंत यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. या सर्व खेळाडूंची जिल्हास्तरीय कुस्ती क्रीडा स्पर्धेत निवड करण्यात आली आहे. या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, होली चाईल्ड एस.एस.सी. बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले, उपमुख्याध्यापिका शर्मिला शेटे, क्रीडा प्रशिक्षक अक्षय डाकी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**तब्बल २७६ धावांनी मिळवला विजय | एकाच सामन्यात तिघांनी झळकावली शतकं**

# कांगारूंनी दक्षिण अफ्रिकेचे कंबरडे मोडले



**| मॅके | वृत्तसंस्था |**

ऑस्ट्रेलियाने मॅके येथे दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात तब्बल ४३२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. त्यात ट्रॅव्हिस हेड, मिचेल मार्श आणि कॅमेरॉन ग्रीन यांनी शतके झळकावली आहेत. त्यामुळे ऑस्ट्रेलियाने एकदिवसीय क्रिकेटमधील त्यांची दुसऱ्या क्रमांकाची सर्वोच्च धावसंख्या उभारली आहे. मात्र, ऑस्ट्रेलियाने दिलेल्या लक्षाच्या पाठलाग करताना दक्षिण अफ्रिकेचा संघ उवघ्या १५५ धावांवर गडगडला. त्यामुळे ऑस्ट्रेलिया संघाने तब्बल २७६ धावांनी विजय मिळवला.

दक्षिण आफ्रिकेचा संघ सध्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात असून त्यांना चांगली झुंज देत आहे. मात्र, मॅके येथे रविवारी (दि.२४) पार पडलेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात ऑस्ट्रेलियाचे फलंदाज गरजत होते. पहिल्या दोन्ही एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेने विजय मिळवत मालिका आधीच खिशात टाकली होती. त्यामुळे ऑस्ट्रेलियासमोर तिसऱ्या सामन्यात प्रतिष्ठा राखण्याचे आव्हान होते. दरम्यान, तिसऱ्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने प्रथम फलंदाजी करताना दक्षिण आफ्रिकेसमोर तब्बल ४३२ धावांचे लक्ष्य ठेवले होते. ऑस्ट्रेलियाकडून ट्रॅव्हिस हेडने सुरुवातीपासूनच आक्रमक खेळ केला. त्याला मिचेल मार्शने दुसऱ्या बाजूने भक्कम साथ दिली. या दोघांनी सलामीलाच तब्बल २५० धावांची भागीदारी केली. अखेर त्यांची भागीदारी केशव महाराजने तोडली आणि हेडला १०३ चेंडूत १४२ धावा करून माघारी परतावे लागले. त्याच्यानंतर लगेचच मिचेल मार्शही १०६ चेंडूत शतक करून बाद झाला. त्याला सेनुरन मुथूसामीने बाद केले. हे दोघे बाद झाल्यानंतर दक्षिण आफ्रिकेला आणखी बळी घेता आले नाही. ऑस्ट्रेलियाकडून नंतर आलेल्या कॅमेरॉन ग्रीन आणि ॲलेक्स कॅरे यांनीही वादळी खेळ केला. ग्रीनने अवघ्या ४७ चेंडूत शतक पूर्ण केले. त्याने ५५ चेंडूत ११८ धावांची नाबाद खेळी केली. तसेच, कॅरे ३७ चेंडूत ५० धावांवर नाबाद राहिला. त्यामुळे ऑस्ट्रेलियाने ५० षटकांत २ बाद ४३१ धावा केल्या.

दक्षिण आफ्रिकेने मालिकेतील सुरवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये दमदार विजय मिळवला होता. मालिकेतील तिसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला ४३२ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेकडून डेवाल्ड ब्रेव्हिसने सर्वाधिक ४९ धावांची खेळी केली. तर, उर्वरित एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. दक्षिण आफ्रिकेचा डाव केवळ १५५ धावांवर आटोपला. त्यामुळे ऑस्ट्रेलियाने हा सामना २७६ धावांनी आपल्या नावावर करत दक्षिण अफ्रिकेवर मोठा विजय मिळवला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)